POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२८४ ● मुंबई, रविवार, १७ मे २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.


MARATHI EKIKARAN BATMIPATRA

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांसाठी आनंदाची बातमी!

पालखी महामागार्बाबत नितीन गडकरींची मोठी घोषणा

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्राच्या आध्यात्मिक परंपरेचा गाभारा मानला जातो. येथे श्री विठ्ठल रुक्मिणीचे पंढरपूर आणि श्री स्वामी समर्थांचे अक्कलकोट यांसारखी जगप्रसिद्ध व भाविकांचे श्रद्धास्थान असलेली तीर्थक्षेत्रे आहेत. राज्यभरातून आणि देशभरातून येथे येणाऱ्या लाखो भाविकांचा प्रवास सुखकर व्हावा, यासाठी या परिसरातील रस्त्यांचे जाळे मजबूत व अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक होते. हीच गरज ओळखून केंद्र सरकारने या भागात भव्य महामार्ग प्रकल्प हाती घेतले आहेत. या महामार्गामुळे भाविकांना आता तीर्थक्षेत्रांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे झाले आहे. विशेषतः दरवर्षी आषाढी वारीसाठी ऊन-पावसाची तमा न बाळगता पायी चालत येणाऱ्या लाखो वारकऱ्यांची सोय लक्षात घेऊन, त्यांच्यासाठी या महामार्गावर एक स्वतंत्र मार्गिका (लेन) तयार करण्यात आली आहे. यामुळे वारकऱ्यांची पायी वारी आता अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. याच पार्श्वभूमीवर, गुरुवारी (१४ मे) नितीन गडकरी यांनी स्वतः संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाच्या सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली व त्यानंतर अधिकाऱ्यांसोबत कामाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला.



आईच्या इच्छेपूर्तीचे समाधान आणि प्रकल्पाच्या पूर्णत्वाचे आश्वासन

या पाहणी दौऱ्यादरम्यान पालखी महामार्गाविषयी संवाद साधताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी जुन्या आठवणींना उजाळा देत भावूक झाले. ते म्हणाले की, "काही वर्षांपूर्वी तुळजापूर, पंढरपूर आणि अक्कलकोटला जोडणाऱ्या रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय होती. खड्डे आणि खराब रस्त्यांमुळे पायी चालणाऱ्या वारकऱ्यांना तसेच वाहनाने येणाऱ्या भाविकांना प्रवासात मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. ही परिस्थिती पाहून माझ्या आईने मला आवर्जून सांगितले होते की, जर कधी भविष्यात तुला संधी मिळाली, तर या तीर्थक्षेत्रांना जोडणारे रस्ते नक्कीच चांगले कर." आईची तीच प्रबळ इच्छा आणि साक्षात पांडुरंगाच्या आशीर्वादाने आज मला या पवित्र मार्गाची सेवा करण्याचे आणि हे रस्ते उत्तम बनवण्याचे भाग्य लाभले आहे, अशी कृतज्ञतेची भावना त्यांनी व्यक्त केली. महामार्गाच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना गडकरींनी स्पष्ट केले की, पालखी महामार्गाचे तब्बल ८० टक्के काम यशस्वीरित्या पूर्ण झाले असून, उर्वरित कामे युद्धपातळीवर मार्गी लावली जात आहेत. ज्या ठिकाणी काही कारणास्तव कामे रखडली आहेत, ती या वर्षाच्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच, वाखरी ते पंढरपूर या टप्प्यातील रस्त्याच्या कामाला रेल्वे प्रशासनाची अद्याप आवश्यक परवानगी मिळालेली नाही. मात्र, त्याबाबत तातडीने पाठपुरावा करून तो अडथळाही लवकरात लवकर दूर केला जाईल आणि वारकऱ्यांसाठी मार्ग मोकळा केला जाईल, असे आश्वासन गडकरी यांनी दिले.

पुरातन विहिरींचे जतन आणि संवर्धन

या दौऱ्यात केंद्रीय मंत्र्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने केलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनाच्या कामाचे विशेष कौतुक केले. माळशिरस तालुक्यातील घुले वस्ती येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेली पुरातन विहीर महामार्गाच्या कामात येत होती. पण तिचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी महामार्गाच्या रचनेत विशेष बदल केला आणि ही विहीर सुरक्षित ठेवली. याच धर्तीवर पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव येथील ऐतिहासिक बाजीराव विहिरीचेही प्राधिकरणाकडून जतन आणि संवर्धन करण्यात आले आहे. या दोन्ही पुरातन विहिरींची पाहणी नितीन गडकरी यांनी केली.

मुंबईत १० टक्के पाणीकपात



■मुंबई । प्रतिनिधी,

मुंबईत शुक्रवारपासून १० टक्के पाणीकपात लागू करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईकरांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालिकेच्या जल विभागाने केले आहे.सात धरणांतून मुंबईकरांची तहान भागवण्यासाठी रोज ३,९५० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यात येतो, तर वर्षभराची तहान भागवण्यासाठी धरणांत १४ लाख ४७ हजार ३६३ दशलक्ष लिटर पाणी साठ्याची गरज भासते.

धरणातील पाणीसाठा आणि भातसा, अप्पर वैतरणा धरणातील राखीव पाणीसाठा उपलब्ध झाल्यानंतर १७ ऑगस्टपर्यंत मुंबईकरांची तहान भागवू शकतो, इतका उपलब्ध आहे. मात्र, यंदा पाऊस कमी पडणार असल्याने भविष्यात पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे.

ठाणे, भिवंडीतही पाणीकपात

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ठाणे, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका व इतर गावांना जो पाणीपुरवठा केला जातो, त्याठिकाणीही शुक्रवारपासून १० टक्के पाणीकपात लागू राहणार आहे.

राज्यावर दुहेरी संकट!

प्रशासनाचा अलर्ट, शक्यतो घराबाहेर पडणे टाळाच

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यात उष्णतेचा कहर बघायला मिळत आहे. एकीकडे अवकाळी पाऊस तर दुसरीकडे कडाक्याचे उन्ह अशी स्थिती आहे. त्यामध्येच भारतीय हवामान विभागाने उष्णतेचा मोठा इशारा दिला. मराठवाडा आणि विदर्भात उष्णतेच्या लाटेचा मोठा इशारा देण्यात आला. यासोबतच काही भागात आज देखील अवकाळी पाऊस हजेरी लावू शकतो. काल तीन जिल्ह्यांमध्ये 45 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. वर्धा, नागपूर, अकोला, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा अलर्ट जारी करण्यात आला. यासोबतच धाराशिव, लातूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये उष्णतेचा इशारा देण्यात आला, तिथे नागरिकांनी शक्यतो दुपारी 12 ते 4 वाजेपर्यंत घरातून बाहेर पडणे टाळावे. उष्माघातासंदर्भात प्रशासनाकडून काही सूचनाही जारी करण्यात आल्यात. राज्यात मे महिन्यात सूर्य अधिक आग ओकताना दिसतोय. 45 अंश सेल्सिअसच्या पुढे तापमानाची नोंद होत आहे. जळगावमध्ये सलग चार दिवसांपासून तापमानाचा पारा 45 अंशाच्या पार आहे. जळगावमध्ये 45.3 अंश सेलिअस एवढ्या तापमानाची नोंद झाली. दोन दिवसांपूर्वी 45. 6 अंश सेल्सिअसवर पोहोचले होते. 45 अंशांच्यावर तापमान असल्याने उकाड्यात आणि उष्णतेत प्रचंड वाढ झाली. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडले, नागरिकांची वर्दळ कमी झाल्याचे चित्र आहे. नंदुरबार जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून उष्णतेचा कहर होता. आता तापमानात काहीशी घट झाल्याने नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन दिवसांपासून जिल्ह्याचे तापमान 41 अंश सेल्सिअसवर स्थिर असून, यापूर्वी या आठवड्यात तापमानाचा पारा तब्बल 45 अंशांपर्यंत पोहोचला होता. मात्र, तापमानात घट झाली असली तरी हवेत आद्रतेचे प्रमाण कमी असल्याने उकाडा कायम असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

कारागृहात असूनही भोंदू खरात कमवतोय कोट्यवधींची रक्कम

रिंग रोग कनेक्शन वाचून डोळे चमकतील

■ठाणे। प्रतिनिधी,

भाविष्यावाणी, अंकज्योतिषाच्या माहितीचा बनाव रचून अनेकांची फसवणूक करणाऱ्या आणि महिलांच्या अत्याचाराचा गंभीर आरोप असणाऱ्या अशोक खरातच्या दुष्कृत्यांचा दर दिवशी नवा पाढा वाचला जात आहे. त्यातच आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. जिथं खरात कोठडीत असूनही त्याची कमाई सुरूच आहे, बरं कमाईचा आकडा कोट्यवधींच्या घरात आहे, ज्यामुळं अनेकांचेच डोळे चमकले आहेत. राहिला मुद्दा खरातची ही कोट्यवधींची कमाई नेमकी होतेय कुठून, याबाबतचा तर त्यामागचं कारणसुद्धा लक्षवेधी आहे.

खरात कुठून कमवतोय इतकी मोठी रक्कम?

खरातच्या खात्यावर येणारी कोट्यवधींची रक्कम ही रिंग रोड साठीच्या भूसंपादनातून येत असून, त्याला एकदोन नव्हे तर तब्बल तीन कोटी रुपये मिळणार आहेत. ज्यामुळं कारागृहात असूनही भोंदू अशोक खरातची कमाई सुरूच आहे असं म्हटलं जात आहे. रिंग रोड साठी केवळ दोन जागांच्या भूसंपादनातून त्याला सुमारे अडीच कोटी रुपये मिळणार आहेत. तर, गवळणे परिसरात अशोक खरात आणि पत्नी कल्पना खरात या दोघांना 82 लाख 83 हजार रुपये मिळणार आहेत. पाथर्डी परिसरात तृप्तबाला आणि सृष्टी खरातला मिळणार एक कोटी 82 लाख रुपये मिळणार आहेत. सोबत निलंबित उपजिल्हाधिकारी भांडे पाटील यांच्या पत्नीलाही लाखो रुपये मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. खरात खरेदीप्रक्रियेत उपस्थित राहण्याची शक्यता नसल्याने दर कमीसुद्धा होऊ शकतात अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. मात्र, भूसंपादनाचा फायदा घेण्यासाठी दोन्ही मुलींना उपस्थित राहणे आवश्यक असेल ही बाबसुद्धा महत्त्वाची.




खरात प्रकणी मुंबईतील उपजिल्हाधिकारी निलंबित

दरम्यान, खरात प्रकरणात नुकतंच मुंबईतील उपजिल्हाधिकारी अभिजित भांडे-पाटील यांच्यावर निलंबनाची कारवाईसुद्धा झाली. तपासातील माहितीनुसार, भांडे-पाटील यांनी खरातच्या पत्नी आणि मुलीच्या नावावर असलेल्या जमिनींमध्ये मोठी गुंतवणूक केली होती. खरात आणि भांडे यांच्यात तब्बल 143 वेळा फोनवर संभाषण झालं होतं. एका जबाबदार पदावर असलेल्या अधिकाऱ्याने गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या व्यक्तीच्या कुटुंबासोबत आर्थिक व्यवहार केल्यामुळे सरकारने ही मोठी कारवाई केली. आता खरात प्रकरणात पुढं कोणता खुलासा होतो यावरही यंत्रणांचं लक्ष असेल.

खरात प्रकरणातील आणखी एक मोठी बातमी म्हणजे खरात एसआयटीचा चार्ज असलेल्या तेजस्वी सातपुते यांची पुणे पोलिसांच्या गुन्हेशाखा अप्पर आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. त्या यापूर्वी एसआरपी पुणे कॅम्प च्या प्रमुख पदी होत्या.

सकाळी 8.15 ची वेळ, 'टेडीबेअर'मुळे पिंपरीत खळबळ

बॉम्ब शोधक पथकाची पळापळ अन् सोडला सुटकेचा निश्वास...



■पुणे। प्रतिनिधी,

पिंपरी चिंचवडकरांसाठी आजचा दिवस धाकधुकीचा ठरला. पिंपरी चिंचवडच्या एका गर्ल्स हॉस्टेलच्या बाहेर एक बॉक्स दिसल्याने चांगलीच खळबळ उडाली. अज्ञात व्यक्तीने हा बॉक्स ठेवला. अचानक दिसलेल्या या वस्तूमुळे सर्वांचेच धाबे दणाणले. यात बॉम्ब तर नाही ना? अशी भीती निर्माण झाली. त्यानंतर लगेचच पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांनीही या संपूर्ण परिसराचा ताबा घेत नाकेबंदी केली. त्यानंतर पोलिसांनी हा बॉक्स मोठ्या शिताफिने उघडाल, तोच त्यात...

पिंपरी चिंचवडच्या संत तुकाराम नगरमधील डीवाय पाटील विद्यापीठाच्या गर्ल्स हॉस्टेलवर आलेल्या एका गिफ्ट पॅकेजमुळे मोठी खळबळ उडाली. डीवाय पाटील राजे राजेश्वरी गर्ल्स हॉस्टेलच्या गेटवर सकाळी 8.15 च्या सुमाराला एक भला मोठा गिफ्टचा बॉक्स ठेवण्यात आला होता. त्या बॉक्सचा संशय आल्याने सुरक्षा रक्षकाने पोलिसांना फोन केल्यानंतर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या घटनेमुळे विद्यापीठाच्या परिसरात एकच खळबळ उडाली होती. विद्यार्थीनीं आणि विद्यार्थ्यांमध्येही मोठी खळबळ उडाली. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून बॉम्ब ठेवल्याचे निनावी फोन येत आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस अलर्ट झाले होते. काही दिवसांपूर्वी पुण्याच्या खासगी हॉस्पिटलमध्ये स्फोटकं ठेवल्याच्या आरोपाखाली एका व्यक्तीला अटक केली होती. या व्यक्तीने केवळ पैसे वसूल करण्यासाठी हा प्रकार केला होता. त्याच्याकडे रुग्णालयात जाण्यासाठी पैसे नव्हते म्हणून त्याने हा प्रकार केल्याचं उघड झाले होते.

अन् सर्वांनीच...

दरम्यान, आज गर्ल्स होस्टेलच्या बाहेर अचानक मोठा बॉक्स दिसल्याने पोलिसांनी या परिसरात नाकेबंदी केली. संपूर्ण परिसराचा ताबा घेतला. कुणालाही परिसरात सोडण्यात येत नव्हते. मुलींनाही बॉक्सच्या आसपास जाण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी स्वतः हा बॉक्स उघडला. त्यात एक टेडी बियर ठेवलेला आढळला. त्यामुळे पोलीस अधिक सतर्क झाले. टेडी बियरमध्ये तर बॉम्ब नाही ना? असं प्रत्येकाच्या मनात आलं. त्यानंतर टेडी बियरची तपासणी करण्यात आली तर त्यात असं काही नव्हतं. बॉक्समध्ये केवळ टेडी बियर होता. बॉम्ब नव्हता हे स्पष्ट झालं. त्यामुळे पोलीस, वसतिगृहातील मुली आणि विद्यापीठ प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला.

पोलिसांनी पोलिसांनी बॉक्सची तपासणी करत बॉक्स उघडल्यानंतर त्यामध्ये टेडी बियर असल्याचं स्पष्ट झालं. पण पुण्यात नुकत्याच घडलेल्या बॉम्ब ठेवण्याच्या प्रकाराच्या पार्श्वभूमीवर बॉक्समुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर या बॉक्समध्ये कोणतीही धोकादायक वस्तू नसल्याचे स्पष्ट झाल्याने सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला, अशी माहिती पोलीस निरीक्षक गोरख कुंभार यांनी दिली.

तो कोण?

पोलिसांनी अधिक तपास केल्यानंतर होस्टेलवरच्या एका मुलीला तिच्या बॉयफ्रेंडने हा टेडी बियर गिफ्ट पाठवला असल्याचं स्पष्ट झालं. मात्र, मैत्रीणीसाठी टेडी बियर ठेवणारा व्यक्ती कोण? आणि होस्टेलमधील ती मुलगी कोण? याचा शोध अजून लागलेला नाही. पोलीस याचा तपास करत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

नाशिकमध्ये सराफ दुकानात दरोड्याचा थरार, चोरट्याने पिस्तूल दाखवल्यानंतरही महिलेचे 'जाबाज' रूप



■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमधील एका सराफा दुकानात सशस्त्र दरोडा घालण्यात आला. यात एक महिला जखमी झाली आहे. पंचवटीतील हिरावाडी परिसरातील महालक्ष्मी नगर येथील ह्यसमृद्धी ज्वेलर्स या दुकानामध्ये ही घटना घडली. दुकानावर शुक्रवारी रात्री 4 ते 5 अज्ञात दरोडेखोरांनी सशस्त्र दरोडा टाकला. रात्री 9 ते साडेनऊच्या सुमारास 4 ते 5 संशयित ग्राहक बनून ज्वेलर्सच्या दुकानात शिरले आणि या तरुणांनी अचानक पिस्तूल आणि इतर शस्त्रांचा धाक दाखवला. या घटनेचा सीसीटीव्ही समोर आला आहे. यात दुकानात दोन महिला आणि एक पुरुष होते. जेव्हा हा दरोडा टाकण्यात आला. एका महिलेने आणि पुरुषाने चोरांना धाडसाने सामना केला.

प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता,दरोडेखोरांनी क्रूरतेचा कळस गाठला. मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी दुकानाचे मालक आणि उपस्थित असलेल्या महिलेला धमकावण्यास सुरुवात केली. त्यांना प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता या दरोडेखोरांनी पिस्तुलानं महिला आणि पुरुषाच्या डोक्यावर प्रहार केले. या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झालीये. या जखमींना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मारहाण केल्यानंतर दरोडेखोरांनी दुकानातील सोन्याचे दागिने आणि इतर मौल्यवान वस्तू घेत पसार झाले.

दरम्यान दरोडा टाकल्यानंतर सर्व संशयित आरोपींनी दुचाकी किंवा चारचाकी वाहनाने मुंबईच्या दिशेने फरार झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आला आहे. पोलिसांनी दुकानाची पाहणी करून पंचनामा केला आहे. तसंच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतलंय. संशयितांच्या शोधासाठी पोलिसांची विविध पथकं इगतपुरी आणि मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. एवढंच नाही तर शहरात ठिकाणठिकाणी नाकाबंदी करण्यात आलीय. संशयितांना पकडण्यासाठी पोलिसांनी कसून शोधमोहीम हाती घेतली असून भरवस्तीत आणि वर्दळीच्या वेळी घडलेल्या या प्रकारामुळे व्यापाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीदायक वातावरण आहे.

बाप चोर, बापाची पोरंही चोर... कल्याणमध्ये बापाकडून बंद घरांची रेकी, मुलांकडून घरफोडी

■कल्याण । प्रतिनिधी,

आपली मुलं खूप शिकावीत, मोठी व्हावीत, यशस्वी व्हावीत, त्यांनी चांगलं नाव कमवावं अशी प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असतात. आई-वडील मुलांना चांगल्या मार्गावर चालण्याची शिकवण देतात, मात्र कल्याणमध्ये एक धक्कादायक आणि विपरीत प्रकार घडल्याचते समोर आलं आहे.वडिलांनी स्वतः वेगवेगळ्या सोसायट्यांमध्ये फिरून बंद घरांची 'रेकी' करायची आणि त्याची माहिती पोटच्या मुलांना देऊन त्यांच्याकडून घरफोड्या करून घ्यायचं, असा धक्कादायक प्रकार उघड झाला असून, चोरीच्या कारवाया करणाऱ्या या भयानक टोळीचा कल्याणच्या महात्मा फुले चौक पोलिसांनी पदार्फाश केला. याप्रकरणी पोलिसांनी दोन पित्यांसह एकूण तीन आरोपींना बेड्या ठोकल्या असून दोन अल्पवयीन बालकांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून तब्बल 21 लाख 60 हजार रुपये किमतीचे 18 तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, कल्याण परिसरातील घरफोडीचे एकूण 4 गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे.

कल्याणमध्ये पकडली फॅमिली गँग



कल्याण पश्चिमेकडील घरफोडीने लागला चोरांचा सुगावा

रामबाग लेन नंबर ४ येथील रहिवासी एम. अरविंद राजाराम पै (वय 49) यांच्या बंद घरात 8 मे 2026 रोजी अज्ञात चोरांनी डल्ला मारला होता. याप्रकरणी महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना पोलिसांच्या तपास पथकाला गुप्त बातमीदारामार्फत एक महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी 13 मे 2026 रोजी कैलास विलास भालेराव (वय 19, रा. मोहने, आंबिवली) याला अटक केली. तसेच त्याच्यासोबत असलेल्या १४ आणि १५ वर्षांच्या दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. या दोन्ही मुलांना भिवंडीच्या बाल न्यायालयात हजर करून बालसुधारगृहात पाठवण्यात आले आहे.

वडीलच होते मास्टरमाईंड

मुख्य आरोपी कैलास भालेराव याची कसून चौकशी केली असता, या संपूर्ण गुन्ह्यामागचा मास्टरमाईंड त्याचे वडील आणि त्यांचे मित्र असल्याचे समोर आले. अटक केलेला मुख्य आरोपी आणि एका अल्पवयीन मुलाचे वडील विलास भालेराव (वय 38, व्यवसाय- साफसफाई) आणि दीपक जाधव (वय 40, व्यवसाय- बिगारी) हे दोघेही वेगवेगळ्या सोसायट्यांमध्ये काम करत असताना बंद घरांची रेकी करायचे. कोणत्या सोसायटीत कोणते घर बंद आहे, याची इत्यंभूत माहिती ते आपल्या मुलांना पुरवायचे. वडिलांनी दिलेल्या ह्यटिपह्नुसार ही मुले त्या सोसायटीत जाऊन कडी-कोयंडा तोडून घरात घुसायची आणि मुद्देमाल चोरायची.

मौजमजेसाठी चोरी, दागिने विकायचे वडील!

चोरी करून आणलेली रोख रक्कम ती मुलं स्वतःच्या मौजमजेसाठी उडवायची, तर चोरीचे सोन्या-चांदीचे दागिने विलास भालेराव आणि दीपक जाधव यांच्याकडे आणून द्यायची. हे दोन्ही पिता मिळून त्या दागिन्यांची विक्री करायचे. पोलिसांनी तत्परता दाखवत या दोन्ही आरोपी पित्यांना 15 मेच्या रात्री आंबिवली परिसरातून ताब्यात घेऊन अटक केली आहे.

एकूण 4 गुन्हे उघड, 21 लाखांचा मुद्देमाल हस्तगत

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने आरोपी कैलास भालेराव कडून अत्यंत कौशल्याने तपास केला असता, त्यांनी कल्याण परिसरात आणखी 3 ठिकाणी घरफोड्या केल्याची कबुली दिली. महात्मा फुले चौक पोलीस ठाण्याच्या अभिलेखावरील एकूण 4 गुन्हे या कारवाईमुळे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून पोलिसांनी 1 मंगळसूत्र, 2 गंठण, 3 सोन्याच्या बांगड्याअसे एकूण 18 तोळे वजनाचे 21, 60 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. याबाबत पोलिसांकडून अधिक तपास सुरू आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

'नीट'नेटके का नाही?



वैद्यकीय प्रवेशासाठीची 'नीट' (राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा) परीक्षा ३ मे २०२६ या दिवशी 'नीट' पार पडली म्हणायचा अवकाश तोच प्रश्नपत्रिका फुटल्याचे समोर आले आणि 'राष्ट्रीय परीक्षा संस्थे'ने विद्यार्थ्यांनी दिलेली 'नीट' परीक्षा रहित करण्यात आल्याचे सांगितले. आता ती परीक्षा पुन्हा होणार आहे. अन्वेषणात महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, बिहार, केरळ आणि उत्तराखंड या राज्यांमध्ये पसरलेले किमान ४५ जणांचे बहुराज्यीय रॅकेट उघड झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता 'राष्ट्रीय परीक्षा संस्थे'च्या कारभारावर आणि एकूणच पेपरफुटीच्या गोंधळावर पुनश्च चर्चा होऊ लागली आहे. ३ मे या दिवशी 'नीट' परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या थोडीथोडकी नव्हे, तर तब्बल २२ लाख ७९ सहस्र इतकी आहे. आता त्यांना पुन्हा एकदा मानसिक ताण, अनिश्चितता आणि असुरक्षितता यांना सामोरे जावे लागणार आहे. ही परीक्षा लाखो विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय शिक्षणाच्या स्वप्नांशी जोडलेली आणि भविष्यात देशाच्या आरोग्यसेवेशी जोडलेला महत्त्वाचा भाग आहे. अनेक विद्यार्थी लहान गावांतून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत परीक्षेसाठी अर्ज भरतात. पालक कर्ज काढून मुलांना महागड्या शिकवणीवर्गांना पाठवतात. काही विद्यार्थी दिवसाला १२ ते १४ घंटे यासाठी अभ्यास करतात; पण शेवटी जर प्रश्नपत्रिका आधीच काही लोकांपर्यंत पोचत असेल, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या श्रमांचे मूल्य काय उरते ? हे मूल्य आणि विश्वास ढळत असल्याने प्रश्नपत्रिका फुटल्याच्या बातम्यांच्या पाठोपाठ विद्यार्थ्यांनी निराशेतून आत्महत्या केल्याच्या बातम्याही येऊ लागल्या आहेत. 'नीट'ची प्रश्नपत्रिका फुटण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. वर्ष २०२४ मध्येही असेच 'मर्यादित' पेपरफुटीचे प्रकरण सीबीआय आणि न्यायालय यांनी हाताळले होते. तेव्हाही देशभरातून पेपरफुटी, वाढीव गुण, निकालातील अनियमितता आणि प्रश्नपत्रिका फोडर्णाया टोळ्या यांविषयी गंभीर आरोप झाले होते. तेव्हा केंद्र सरकारने परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्याची घोषणा केली. सायबर सुरक्षा, प्रश्नपत्रिका संरक्षण आणि परीक्षेसंदर्भातील नियमावली अधिक कडक करण्याचे निर्देश दिले, तरीही वर्ष २०२६ मध्ये पुन्हा प्रश्नपत्रिका फुटलीच! तीही इतक्या मोठ्या स्तरावर की, संपूर्ण परीक्षाच पुन्हा घ्यावी लागणार आहे. हा प्रकार 'नीट'पुरता मर्यादित नाही. वर्ष २०१५ पासून आजपर्यंत 'नीट', संशोधनक्षेत्रातील प्रवेशासाठीची 'नेट', राजस्थान आणि उत्तरप्रदेश राज्यांतील शिक्षक पात्रता परीक्षा, शासकीय नोकरीसाठीची 'एस्.एस्.सी', रेल्वेभरती, पोलीस भरती अशा अनेक परीक्षांच्या वेळी प्रश्नपत्रिका फुटणे, खोटे उमेदवार आणि 'ऑनलाईन हॅकिंग'ची (ऑनलाईन माहिती चोरीला जाण्याची) प्रकरणे समोर आली. यांतील सर्वांत भयावह उदाहरण, म्हणजे व्यापम घोटाळा! वर्ष २०१३ मध्ये मध्यप्रदेशात उघडकीस हा एक मोठा प्रवेश परीक्षा आणि भरती घोटाळा होय. या घोटाळ्याने दाखवून दिले की, जेव्हा राजकीय संपर्क, प्रशासनातील भ्रष्ट घटक, शिक्षण माफिया आणि पैशांचे जाळे एकत्र येते, तेव्हा संपूर्ण निवडप्रक्रियाच पोखरली जाते. देशातील शिक्षणव्यवस्थेत 'लीक'तंत्र अधिक प्रभावी होत चालल्याचे हे भयावह चित्र दिसत आहे. एका बाजूला विद्यार्थी आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेत आहेत, तर दुर्सया बाजूला पेपरफुटीचे जाळे चालवणारे लोक कोट्यवधी रुपये कमावत आहेत. ही परिस्थिती केवळ शिक्षणव्यवस्थेची नव्हे, तर समाजाच्या संवेदनाहीनतेचीही लाजिरवाणी साक्ष आहे. अलीकडे सरकारी नोकरी, वैद्यकीय, अभियांत्रिकी शिक्षण हे केवळ रोजगाराचे माध्यम राहिलेले नाही, तर मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी आर्थिक स्थैर्य, सामाजिक प्रतिष्ठा आणि सुरक्षित भवितव्य यांच्याशी निगडित महत्त्वाचे घटक झाले आहेत. त्याचाच लाभ अपप्रवृत्ती घेत आहेत. प्रत्येक मोठ्या पेपरफुटीनंतर चौकशी समित्या स्थापन करतात, काही जणांना अटकही होते; पण काही दिवसांनी सर्व प्रकरण थंड पडते. यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढते. प्रश्न असा निर्माण होतो की, इतक्या संवेदनशील परीक्षांमध्ये वारंवार गोंधळ होऊनही संबंधितांवर कठोर आणि जलद कारवाई का होत नाही? वारंवार होर्णाया पेपरफुटीच्या प्रकारांमुळे अनेक संस्था आणि तज्ञ राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या परीक्षांसाठी स्वतंत्र परीक्षा प्राधिकरण, गुप्त डिजिटल प्रणाली, कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित देखरेख, वेळेत अन्वेषण आणि कठोर शिक्षेची व्यवस्था करण्याची मागणी करत आहेत. काही जण तर त्याही पुढे जाऊन परीक्षा थेट सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली घेण्याची मागणी करत आहेत. ही मागणीच दर्शवते की, सामान्य संस्थात्मक प्रक्रियांवरील लोकांचा विश्वास न्यून होत चालला आहे. पूर्वी शिक्षण हे संस्कार, ज्ञान आणि राष्ट्रसेवा यांचे माध्यम मानले जात होते; पण आता शिक्षणक्षेत्रात प्रचंड व्यापारीकरण झाले आहे. शिकवणी उद्योग, प्रश्नपत्रिका माफिया, दलाल आणि भ्रष्ट अधिकारी यांचे जाळे निर्माण झाले आहे. हे जाळे केवळ परीक्षाच नव्हे, तर देशाचे भविष्य गिळंकृत करत आहे. पेपरफुटीच्या प्रकारांमुळे आज अनेक विद्यार्थ्यांच्या मनात यशासाठी 'अमुकांशी संबंध ठेवायला हवे', हा विचार बळावला नसेल, तर नवल! आणि जर परीक्षा प्रक्रियेवरच विश्वास उरला नाही, तर देशातील गुणवत्ताधारित व्यवस्था कोसळलीच समजायचे. पेपरफुटीच्या समस्येचे मूळ तांत्रिक नाही, तर नैतिक आहे. समाजात प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठा यांचे महत्त्व घटत चालले आहे. विद्यार्थ्यांना केवळ गुण मिळवण्याचे शिक्षण दिले जात आहे; पण मूल्यशिक्षण, धर्मशिक्षण आणि चारित्र्यनिर्मिती यांकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे. परिणामी 'योग्य मार्गाने यश' याऐवजी 'कोणत्याही मागार्ने यश' हा विचार दृढ होत आहे. 'नीट' पेपरफुटी प्रकरण हे केवळ एका परीक्षेचे संकट नाही; ते संपूर्ण व्यवस्थेच्या रोगाचे लक्षण आहे. आज जर या भ्रष्ट जाळ्यावर कठोर प्रहार झाला नाही, तर उद्या देशातील कोणतीही परीक्षा विश्वासार्ह रहाणार नाही. विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास टिकवायचा असेल, तर शासनाला तात्काळ, कठोर आणि दूरदर्शी विचाराने कारवाई करावी लागेल. उपाय म्हणून सर्व राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांसाठी अत्यंत सुरक्षित तंत्रज्ञानाधारित यंत्रणा निर्माण करणे, पेपरफुटी प्रकरणे विशेष जलद गती न्यायालयांत चालवणे, दोषींना कठोर शिक्षा देऊन त्यांची संपत्ती जप्त करणे, शिक्षणक्षेत्रातील व्यापारीकरणावर नियंत्रण आणणे, तसेच विद्यार्थ्यांना नैतिकता, राष्ट्रप्रेम आणि धर्माधिष्ठित मूल्ये रुजवणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात कष्ट नाही, तर काहीही करून यश मिळवण्याची सवय लागेल, जी भारतासाठी अत्यंत घातक ठरेल.

जरा गांभीर्याने घ्या...



या आठवड्यामध्ये वैद्यकीय पदवी प्रवेशांसाठी घेण्यात आलेल्या 'नीट' परीक्षेचे पेपर फुटल्यामुळे ती संपूर्ण परीक्षा रद्द करून आता पुन्हा नव्याने घेण्याचा निर्णय झाला. आता दोन महिन्यांच्या अंतराने ती परीक्षा पुन्हा होईल. या परीक्षेला बसलेले काही लाख विद्यार्थी व त्यांचे पालक यामुळे निराश झाले असतील; पण या सर्व विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा या परीक्षेच्या तयारीसाठी कंबर कसावी लागेल. परीक्षा झाली म्हणून आलेला निवांतपणा झटकून पुन्हा एकदा परीक्षेची तयारी करणे, त्यासाठी मानसिक तयारी करणे आणि पुन्हा एकदा आपला अभ्यास त्या पातळीवर नेण्यासाठी धडपडणे ही खरोखरच अवघड गोष्ट आहे; किंबहुना ते मोठे आव्हान आहे. पण कोणाच्या तरी हव्यासाची शिक्षा लक्षावधी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना मिळाली, हे नक्की.

या सगळ्याकडे मुळातून बघण्याची गरज आहे. वैद्यकीय शिक्षण हे आपल्या शैक्षणिक व्यवस्थेमध्ये सर्वोच्च स्थानावर आहे. याचे मूळ कारण म्हणजे हे शिक्षण घेण्याची संधी अतिशय मर्यादित आहे. स्वातंत्र्यानंतर आपण आरोग्य व्यवस्थेवर पुरेसे काम केलेले नाही. अजूनही परिस्थिती तशीच आहे. मलेशिया, थायलंड, सिंगापूर या सारख्या देशांमध्येही सरकारी आरोग्यव्यवस्था ही नव्वद ते पंचाण्णव टक्के नागरिकांच्या आरोग्याची सोय करते. ती अत्यल्प पैशांमध्ये मिळते. अमेरिका व युरोपमध्ये आरोग्यविमा तुमच्या खर्चाची काळजी घेतो.

दुर्दैवाने आपण या दोन्ही पद्धतींकडे पुरेसे लक्ष दिलेले नाही. आपल्याकडची सरकारी रुग्णालये कितीही चांगले काम करत असली तरी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांची संख्याच इतकी प्रचंड असते की ही व्यवस्था कोलमडून पडते. आजही मुंबईच्या जेजे किंवा पुण्यातल्या ससून रुग्णालयांमध्ये मंजूर रुग्णसंख्येच्या किमान दुप्पट रुग्ण दाखल असतात, मग त्यांची सोय जमिनीवरील बेडवरच केली जाते, यात आश्चर्य नाही.

हीच गोष्ट वैद्यकीय शिक्षणाची. हाताच्या बोटावर मोजता येतील इतकीच वैद्यकीय महाविद्यालये, त्यामुळे त्यामध्ये प्रवेश मिळणे ही फार मोठी गोष्ट समजली जाते. पूर्वी बारावीच्या परीक्षेतील गुणांवर हे प्रवेश मिळत. मात्र स्पर्धा तीव्र झाल्यानंतर या प्रवेशांसाठी वेगळी प्रवेश परीक्षा आली. मग संपूर्ण देशामध्ये एकच प्रवेश परीक्षा हवी यातून 'नीट'सारख्या परीक्षेचा जन्म झाला. त्यासाठी वेगळी यंत्रणा उभी राहिली. दुर्दैवाने ही यंत्रणा पुरेशी सक्षम नाही. कारण गेल्या तीन वर्षांत अशा प्रकारे प्रवेश परीक्षेचे पेपर फुटण्याची ही दुसरी वेळ आहे. आता ही परीक्षा जून महिन्यात होईल. त्यानंतर निकाल लागण्यासाठी किमान महिना ते दीड महिना लागेल. मग प्रवेश प्रक्रिया. त्यामध्ये राष्ट्रीय स्तरावरील राखीव प्रवेश, राज्यस्तरावरील प्रवेश, विविध आरक्षणे.... हे होताना त्यामध्ये न्यायालयातील याचिका असतीलच. त्यामुळे हे प्रवेश पूर्ण होऊन प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होण्यासाठी सप्टेंबर महिना उजाडेल. वास्तवामध्ये पहिले सत्र ऑक्टोबर महिन्यात संपणे अपेक्षित असते.

वैद्यकीय प्रवेशासाठीची स्पर्धा अतिशय तीव्र बनल्याने त्याच्या तयारीसाठी कोचिंग क्लासेस आले. आता तर दहावीच्या आधीपासूनच या परीक्षांची तयारी करून घेणारे क्लासेस आहेत. त्यासाठी पालक लक्षावधी रुपये खर्च करतात. त्यासाठी गाव, घर सोडून मोठ्या शहरांमध्ये दोन-अडीच वर्षांसाठी राहण्यास येणाऱ्यांची संख्या हजारांमध्ये आहे. पूर्वी आयएएस परीक्षेसाठी दिल्लीमध्ये जायची पद्धत होती. मग आयआयटीसाठी कोटा प्रसिद्ध झाले; आता या वैद्यकीय शिक्षणासाठी सर्व महानगरे प्रसिद्ध आहेत. तेथे मोठमोठ्या कोचिंग क्लासच्या चकचकीत इमारती आहेत, त्यांचे मोठे शुल्क आहे. परवडते त्यांनी या वाटेला जावे.

गरिबाने जमले तर परीक्षा देऊन बघावी, मिळाले यश तर प्रवेश घ्यावा; अन्यथा वेगळी वाट निवडावी, असा हा सगळा रोकडा व्यवहार. फीचा आकडा दर वर्षी वाढवायचा तर जाहिरात करण्यासाठी आपल्या अधिकाधिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. त्यासाठी प्रश्नपत्रिकाच फोडली तर काम अधिक सोपे होईल, अशा चक्रव्यूहातून ही स्थिती निर्माण होते. आताही उघडकीस येत असलेला प्रकार याच साखळीतला आहे. एका प्राध्यापकाला झालेली अटक याकडे अंगुलीनिर्देश करते आहे.


हे सगळे उघडकीला आल्यानंतर अनेक प्रश्न पडतात. राष्ट्रीय स्तरावरील एकच परीक्षा घेण्याचा अट्टाहास का, येथपासून ते एवढे तंत्रज्ञान विकसित झाल्यानंतरही पेपरफुटी होतेच कशी, येथपर्यंतचे हे प्रश्न आहेत. आता पुढील वर्षी ही परीक्षा संगणकांद्वारे घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे, पण या वर्षी झालेल्या मनस्तापाची किंमत कोण मोजणार, याचे उत्तर केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी दिलेले नाही. एकूणच आपण या प्रकाराकडे अजूनही गंभीरपणे बघण्यास तयार नाही, असेच चित्र उभे राहते.

अर्थात आपण कशातच गंभीर नाही, हे वारंवार दिसतेच. याच आठवड्यात पंतप्रधानांनी एकूण जागतिक परिस्थिती पाहून बचतीचे आवाहन केले आहे. सोने खरेदी करू नका, परदेश प्रवास टाळा येथपासून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वापरा येथपर्यंतचे ते आवाहन आहे. ते गरजेचे होते का, निवडणुका संपेपर्यंत ते करण्यास विलंब का केला, येथपासून स्वतः पंतप्रधान त्याकडे गंभीरपणे बघणार का. येथपर्यंत अनेक प्रश्न निर्माण होतात. ही उत्तरे मागताना या प्रकरणातील गांभीर्यच आपण घालवितो आहोत, हे मात्र आपण विसरतो. युद्धजन्य परिस्थितीमुळे इंधन उपलब्धतेवर मोठा परिणाम होणार आहे व त्यासाठी मोठे परकीय चलन खर्ची टाकावे लागणार आहे, हे प्रत्येकाला माहिती आहे.

सोने तातडीने खरेदी केले नाही तरी फार काही बिघडणार नाही, हेही आपल्याला माहिती आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर सार्वजनिक जीवनामध्ये असलेल्यांनी केला पाहिजे यामध्ये काहीच नवीन नाही. पण याकडे दुर्लक्ष करून त्याची चर्चा करण्यात व जाहिरातबाजी करण्याकडे आपला कल आहे. पंतप्रधानांच्या ताफ्यात दोनच गाड्या येथपासून ते मुख्यमंत्री मोटारसायकलवरून मंत्रालयात, तर महापौर सायकलवरून महापालिकेमध्ये येथपर्यंत सगळे वाजवून सांगितले जात आहे. मुळात पंतप्रधानांच्या ताफ्यामध्ये एरवी यापेक्षा अधिक गाड्या का असतात, त्याची गरज का असते हे कोणी सांगणार नाही. मुख्यमंत्र्यांनी मोटारसायकलवरून जाणे योग्य आहे का, वाटेत अपघात झाला तर त्याची जबाबदारी कोणाची, असे अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनाला आपापली जबाबदारी ओळखून प्रतिसाद देणे योग्य. ते करताना तरतम भाव बाळगला पाहिजे.

प्रसिद्धीसाठी एक दिवस स्तोम माजविण्यात अर्थ नाही. या सगळ्याकडे गांभीर्याने बघायला हवेच; पण त्याचबरोबर हा साधेपणा फक्त युद्धजन्य परिस्थितीत नाही तर कायमस्वरूपी असायला हवा. गोव्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर परींकर स्कूटरवरून सकाळी मंत्रालयात जात, पण त्याच्या कधी बातम्या झाल्या नाहीत. लोकांनाही त्याचे अप्रूप वाटत नव्हते, ना मुख्यमंत्र्यांना आपण काही तरी वेगळे करतो आहोत असे वाटत होते. हीच भावना कायमस्वरूपी हवी.

शेवटी मुद्दा तोच आहे. 'नीट'च्या परीक्षेचे संचलन असो किंवा पंतप्रधानांच्या आवाहनाला द्यायचा प्रतिसाद, या सगळ्याकडेच पुरेशा गांभीर्याने आणि सातत्याने बघण्याची गरज आहे. उगाचच प्रत्येक गोष्टीची जाहिरात आणि प्रसिद्धी करून आपण नक्की काय साध्य करणार?



वर्तमानाचेही भान हवे!

तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईचा येत्या काही वर्षांत विकास होणार आहे. तिसऱ्या मुंबईच्या विसकासाचे दृष्टीने तर महत्त्वाचे पावलेही उचलली जात आहेत. पण या दरम्यान, सध्याच्या शहराकडे दुर्लक्ष होत आहे का?

सध्याच्या मुंबईचा श्वास कोंडत असल्यामुळेच तिसऱ्या आणि चौथ्या मुंबईचा वेगाने विकास करण्यासाठी महाराष्ट्र सरकार धडपड करत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच केले. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या व्यासपीठावर दिलेल्या मुलाखतीमध्ये फडणवीस यांनी पनवेल-उलवे-उरण या परिसरामध्ये तिसरी मुंबई वेगाने वसत असल्याचे सांगतानाच वाढवणजवळ विकसित होत असलेल्या बंदराच्या निमित्ताने चौथी मुंबई विकसित केली जाणार असल्याचेही सांगितले. सत्तरच्या दशकामध्ये नवी मुंबई विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केल्यामुळे आज मुंबईचा विकास होऊ शकला, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. कोणी कितीही नाकारण्याचे प्रयत्न केले तरी गेले शतकभर मुंबई हीच देशाची आर्थिक राजधानी राहिलेली आहे, पुढील शतकभरही राहील. साहजिकच रोजगाराच्या निमित्ताने आणि प्रगतीच्या आसेने येत्या काळामध्ये हजारो नागरिक दर वर्षी या शहरामध्ये येऊन आपले स्थान निर्माण करण्यासाठी धडपड करणार. किमान हे भान ठेवून येणाऱ्या या लोकांना सामावून घेण्याचा आणि त्यांना किमान नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याचा विचार राज्य सरकार करत आहे, असेच मुख्यमंत्र्यांच्या प्रतिपादनातून स्पष्ट होते. अर्थात याचे स्वागतच करायला हवे. पण हे होत असतानाच सध्याच्या मुंबईकडेही अधिक लक्ष देण्याची गरज आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये मुंबईमध्ये काही किमान मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. रस्ते, उड्डाणपूल, कोस्टल रोड, मेट्रो यांसारखे प्रकल्प मार्गी लागत असले तरीही त्याचा वेग अजूनही वाढविण्याची गरज आहे. दक्षिण मुंबई आणि मध्य मुंबईमध्ये या सुविधा निर्माण होत असल्या तरीही उपनगरांमधले प्रश्न याच काळामध्ये जटील होताना दिसतात. विशेष करून मुंबई-ठाणे-कल्याण-कर्जत या लोहमार्गाच्या परिसरातील उपनगरांकडे गेल्या अनेक वर्षांत कोणीच लक्ष दिले नसल्याचे सातत्याने जाणवत राहते. मुंबईमध्ये अनेक उड्डाणपूल बांधले जात असताना ठाणे-कल्याण व कर्जत परिसरामध्ये मुंबईहून जाण्यासाठी चांगला रस्ता का नसावा, याचे उत्तर अजून एकाही राज्यकर्त्याने देण्याचे कष्ट घेतलेले नाहीत. या परिसरातील लोकप्रतिनिधींनाही त्याचे काही वाटत नाही. शीळ फाट्यावरची वाहतूक कोंडी दिवसाच्या चोवीस तासांत कधीही होऊ शकते याबद्दल सगळ्यांमध्येच एकमत असते; पण ती किंवा या रस्त्यावर इतर ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी फुटावी यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत. या परिसरामध्ये मेट्रोचे काम सुरू असले तरीही ते कधी पूर्ण होईल हे अजूनही नजरेत येत नाही. ठाण्याच्या घोडबंदर रस्त्यावरील नागरिकांना तर संयमाचे दररोज बक्षीस देण्याची गरज आहे. राष्ट्रीय महामार्ग असलेल्या या रस्त्याकडे जितक्या अनास्थेने बघितले जात आहे तितके देशातील इतर कोणत्याही रस्त्याकडे बघितले जात नसावे. लक्षावधी नागरिकांची दररोज होणारी गैरसोय हीच सोय असल्याच्या थाटात प्रशासन आणि लोकप्रतिनिधी कसे राहू शकतात, हाच प्रश्न आहे. बदलापूर, अंबरनाथ, कळवा यासारख्या उपनगरांमधील नागरी सुविधांची स्थिती त्याहून भीषण आहे. नुसत्या नगरपालिका किंवा महानगरपालिका स्थापन करून प्रश्न सुटत नाहीत. मुख्य मुंबईला जोडण्यासाठी असलेली लोकल रेल्वे सेवाही दिवसेंदिवस बेभरवशाची होत असल्याने या परिसरातील नागरिकांची अवस्था 'आई जेवू घालेना....' अशी झाली आहे. पश्चिम उपनगरातील नागरिकांची स्थिती काहीशी बरी असली तरीही तेथेही सुधारणेला भरपूर वाव आहेच. गेल्या पंचवीस तीस वर्षांमध्ये बोरीवलीनंतर पश्चिम उपनगरांमध्ये झालेली वाढ ही वाढ नसून दिवसेंदिवस सूज बनते आहे. मुंबईमध्ये वाहतुकीखालोखाल आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, शिक्षण या सगळ्याच सुविधांचा दर्जा दिवसेंदिवस वेगाने घसरतो आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये दाखल झालेल्या रुग्णांना उंदीर घेत असलेले चावे आणि मुंबईच्या उपनगरांमध्ये असलेल्या नाले व छोट्या नद्यांमधून वाहणारे सांडपाणी, त्यामुळे येणाऱ्या साथी याची दखल तर आता माध्यमांनीही घेणे सोडून दिले आहे. पिण्याच्या पाण्याची स्थितीही दिवसेंदिवस गंभीर होते आहे. या आठवड्यातच मुंबईत दहा टक्के पाणी कपात लागू होते आहे. पुढील दोन महिने तरी ती कायम राहील. पावसाने वेळेवर हजेरी लावली नाही तर मुंबईकरांच्या तोंडचे पाणी पळण्याचीच चिन्हे आहेत. त्यामुळे तिसऱ्या व चौथ्या मुंबईने सध्याच्या मुंबईचा श्वास मोकळा होण्याची आशा व्यक्त केली तरीही त्याच्या मर्यादा लक्षात घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर सध्याची मुंबई व्हेंटिलेटरवर जाण्याअगोदर तिचे आरोग्य सांभाळण्यासाठी तातडीने पावले टाकण्याची गरज आहे.



संपूर्ण खासगीकरणाच्या दिशेने

भारताच्या व्यापक शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर २८ एप्रिलचा दोन पानी आदेश ही 'राजकीय शैक्षणिक कृती' आहे. जी काही थोडीफार अनुदानित महाविद्यालये अस्तित्वात आहेत, त्यांच्या खासगीकरणाची ही पूर्वतयारी आहे.

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २८ एप्रिल २०२६ रोजी अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे खासगी विद्यापीठात रूपांतर करण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास करण्यासाठी, नियम ठरवण्यासाठी व शिफारशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती नेमली असल्याचा आदेश काढला आहे. डॉ. भूषण पटवर्धन, तसेच उपसचिव (विद्यापीठ शिक्षण), संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण विभाग हे या समितीचे सदस्य आहेत.

थोर शिक्षणतज्ञ जे. पी. नाईक यांनी शैक्षणिक 'पुनर्रचनेच्या पूर्व अटी' यामध्ये असे म्हटले आहे, की एक-कोणतेही शिक्षण धोरण समाजाच्या पोकळीत निर्माण होत नाही तर सामाजिक आर्थिक, राजकीय पर्यावरणातून ते आकाराला येते. दोन-शिक्षण हे राजकारण आहे! तीन- भांडवलशाही समाजात शिक्षण धोरण सत्ताधारी वर्गाच्या हितसंबंधांचे संरक्षण करते. २८ एप्रिलच्या दोन पानी आदेशाचा अर्थ केवळ शब्दांत काय दिला आहे, यावरून लावून चालणार नाही तर जे. पी. नाईकांच्या दृष्टीने त्याकडे पाहिले की नेमका अर्थ कळून येईल! भारताच्या व्यापक शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर वरील आदेश ही 'राजकीय शैक्षणिक कृती' आहे. भारतात आधीच उच्च शिक्षणाचे खासगीकरण झाले आहे व जी काही थोडीफार अनुदानित महाविद्यालये अस्तित्वात आहेत त्यांच्या खासगीकरणाची ही पूर्वतयारी आहे.

'आशा' २०२१-२२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात ४,६८५ महाविद्यालय आहेत, त्यातील ६३.५२ टक्के (२,९७६) महाविद्यालये खासगी विनाअनुदानित आहेत, २४.९० टक्के (१,१६७) महाविद्यालये ही अशासकीय अनुदानित आहेत व दहा टक्के (५४२) महाविद्यालये शासकीय आहेत. खासगी विनाअनुदानित महाविद्यालयांत महाराष्ट्रातील उच्च शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या ४१.९५ टक्के विद्यार्थी तर, अशासकीय अनुदानित महाविद्यालयात ४७ टक्के विद्यार्थी आहेत व ११ टक्के विद्यार्थी शासकीय महाविद्यालयांत जातात म्हणजे विनाअनुदानित महाविद्यालयांची टक्केवारी जास्त, पण विद्यार्थी टक्केवारी कमी आहे तर अनुदानित व शासकीय महाविद्यालयांची टक्केवारी कमी, पण विद्यार्थ्यांची टक्केवारी जास्त आहे.

हा फरक 'न परवडणारे शिक्षण' यामुळे झाला आहे! विनाअनुदानित महाविद्यालयांचे शुल्क सामान्य पालकांच्या आवाक्याबाहेर असते. त्यामुळे विद्यार्थी प्रथम अनुदानित व शासकीय महाविद्यालयांना प्राधान्य देतो व शेवटी नाइलाजाने विनाअनुदानित महाविद्यालयात प्रवेश घेतला जातो. याचे प्रमुख कारण असे की, खासगी विनाअनुदानित शिक्षण संस्थेत शिक्षण हा नफेखोरीचा व्यवसाय झाला आहे, पैसे नसणारे शिक्षणातून बाहेर फेकले जात आहेत, शुल्क व गुणवत्ता याचा काहीही संबंध राहिलेला नाही, शासकीय नियम उघडपणे धाब्यावर बसवले जात आहेत, प्राध्यापक व कर्मचारी यांचे पगार, सेवाशर्ती याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. जाहिरातबाजी, शो, प्रचंड मोठ्या इमारती यांसह सत्ताधाऱ्यांच्या वळचणीला राहून सर्व त्रुटी झाकण्याचा प्रयत्न केला जात असतो. गरीब, कष्टकरी, शोषित घटकांच्या मुलांना अनुदानित महाविद्यालयांचा जो काही काडीचा आधार मिळत आहे, तो २८ एप्रिलच्या आदेशाने काढून घेतला जाणार आहे.

महाराष्ट्रात १९८१ मध्ये वसंतदादा पाटील यांनी विनाअनुदानित महाविद्यालयांना मान्यता देण्याचे धोरण अवलंबले होते. १९९१ च्या जागतिकीकरण, उदारीकरण, खासगीकरण व बाजारीकरणाच्या धोरणामुळे समाजाच्या सर्वच क्षेत्रांत खासगीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शिक्षण क्षेत्र त्याला अपवाद राहिले नाही. 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' मध्ये शिक्षणाच्या खासगीकरणाला प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतली गेली आहे. या संपूर्ण धोरणाचा छुपा अजेंडा समाजातल्या धनदांडग्या गटाला शिक्षणाची संधी द्यायची व उरलेल्यांना शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर ढकलायचे हाच आहे! धोरणाची भाषा कितीही 'मिठ्ठास' असली, भाषेचा कितीही 'फुलोरा' असला तरी मूळ उद्देश वेगळा आहे. 'काही थोड्या मुलांनी उच्च शिक्षणात जावे व उरलेल्यांनी आधुनिक बलुतेदारीच्या व्यवसाय कौशल्य विकासाकडे जावे' हा या धोरणाचा छुपा अजेंडा आहे.

शासनाचा २८ एप्रिलचा आदेश हा 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' चे पुढचे पाऊल आहे. पहिल्या टप्प्यावर स्वतंत्रपणे खासगी शिक्षण संस्थांना प्रोत्साहन देण्याची भूमिका होती व आता अशासकीय अनुदानित महाविद्यालयांचे रूपांतर खासगी विद्यापीठांत करण्याचे हे धोरण आहे. त्यासाठी आम्ही 'कडक नियम' तयार करणार आहोत, असे सांगितले जात आहे.


गेल्या ३५-४० वर्षांत अस्तित्वात असलेल्या नियमांची किती व कशी अंमलबजावणी झाली व सरकारी नियमांची शिक्षण सम्राटांनी कशी वाताहत लावली, हे महाराष्ट्र पाहत आहे. त्यामुळे 'नव्या कडक नियमांचे' काय होईल, याचा अंदाज येऊ शकतो! 'अनेक मागार्ने' नियमांतून पळवटा काढण्यात शिक्षण संस्था तरबेज असतात, त्यामुळे शासनाच्या कागदावरच्या नियमांना कोणी घाबरत नाही, हे वास्तव आहे. अपवादाने काही कारवाई झालीच तर 'मी मारल्यासारखे करतो, तू रडल्यासारखे कर' असा हा प्रकार असतो. त्यामुळे कडक नियम इ. फारसे गांभीर्याने घ्यायचे नसतात, हे सर्वांना माहीत आहे; पण जनतेला नियमांचा कागदी वाघ दाखवणे आवश्यक असते म्हणून हा सर्व अभ्यासगटाचा खटाटोप आहे.

अनुदानित महाविद्यालयांचे खासगी विद्यापीठात रूपांतर झाले की त्याचे तीन फायदे आहेत. एक, अनुदानित महाविद्यालयांचे, खासगी विद्यापीठात रूपांतर झाले की सरकारची महाविद्यालयांना अनुदान देण्याची जबाबदारी संपणार आहे. शासनाचे पैसे वाचणार आहेत! हे वाचलेले पैसे 'कशासाठी' खर्च होणार आहेत हेही सर्वांना माहीत आहे! दोन, अनुदानित महाविद्यालयांचे खासगी विद्यापीठात रूपांतर झाले की शिक्षण संस्थांना नफेखोरी करायला रान मोकळे होणार आहे! तथाकथित 'कडक नियम' कसे वाकवायचे व ते कसे 'मॅनेज' करायचे हे सांगायला पष्कळ सल्लागार आहेत, त्यामुळे 'कडक नियमांची' कोणी चिंता करत नाही! तीन, एकदा का अनुदानित महाविद्यालये बंद झाली की या समाजातील गरीब, कष्टकरी, मुली, मागासवर्गीय, अल्पसंख्याक हे उच्च शिक्षणातून कायमच्या बाहेर फेकले जातील व शिक्षणात वरच्या जाती व वर्ग यांची मक्तेदारी स्थापन होईल.

जगात कुठेही शिक्षणाच्या खासगीकरणातून शिक्षणाचे

टॅटू काढून टाकण्यापूर्वी या गोष्टींकडे अवश्य लक्ष द्या!

उत्साहाच्या भरात अनेकदा अंगावर वेगवेगळ्या ठिकाणी टॅटू काढले जातात. काहीजण आपल्या साथीदाराचे नाव टॅटूमध्ये बनवतात. पण कालांतराने नात्यात दुरावा आल्यानंतर तेच नाव नकोसे वाटते. अशावेळेस टॅटू काढून टाकण्यासाठी नेमके काय करावे? ही प्रक्रिया त्रासदायक असते का? याबाबतचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. के. खतुजा यांनी दिला आहे.



▌टॅटू क्रीम परिणामकारक नसतात

टॅटू निघून जाण्यासाठी क्रीम्स किंवा बाम यांचा वापर करण फायदेशीर नाही. कोणत्याच घरगुती उपायांनी किंवा क्रीम लावल्याने टॅटूपासून सुटका मिळत नाही.

▌लाल किंवा पिवळ्या रंगाचे टॅटू कायमचे जाणे कठीण आहे

प्रत्येक रंग शोषून घेण्यासाठी काही विशिष्ट वेव्हलेंग्थ काम करतात. त्यामुळे एकाच वेव्हलेंग्थमुळे सारेच रंग जाणे कठीण असते. अनेकजण काळे आणि निळे घालवणारे लेझर वापरतात. त्याचाच वापर करून लाल किंवा पिवळा रंग जाणे मुश्कील आहे.

▌लेझर त्रासदायक ठरत नाहीत

लेझर ट्रीटमेंटपूर्वी त्वचेवर काही सोल्युशन लावून तेथील भागातील संवेदनशीलता कमी केली जाते. त्यामुळे काही सेकंद तुम्हाला त्रास जाणवतो. लेझर किरणांमुळे वातावरणातील उष्णता अधिक वाढते. म्हणूनच उपचारांदरम्यान आयवेअर दिली जातात. म्हणजे तुम्हाला काहीच दिसत नाही.

▌हात, पाय, घोट्यावरील टॅटू काढणे कठीण आहे

लोअर बॅकच्या भागापेक्षा बोटाच्या सांध्याजवळील टॅटू काढणे कठीण असते. शरीरात रक्तवाहिन्यांजवळील भागातील टॅटू काढणे अधिक सुकर आहे. पाय, घोटा किंवा हात या भागावरील टॅटू काढणे कठीण आहे.

▌अनेक लेझर सेशन्स लागतात

टॅटू पूर्णपणे काढून टाकण्यासाठी सुमारे १०-१५ सेशन्स लागतात. त्वचेला पुन्हा पूर्ववत होण्यासाठीदेखील वेळ द्यावा लागतो.

▌टॅटूच्या खुणा राहतात

टॅटू पूर्णपणे काढला तरीही त्याच्या थोड्याफार खुणा राहतात. टॅटू काढला तरीही तो कोणत्या भागावर होता हे तुमचे मित्र नक्कीच ओळखू शकतात.

▌लेझर ट्रीटमेंटदरम्यान बर्निंग स्मेल येतो

टॅटू काढताना तुम्हाला काही जाणवत नसले तरीही वास येतो. यादरम्यान त्वचेवर लेझरची किरणे जेव्हा त्वचेत जातात तेव्हा laser plume घटक वातावरणात मिसळल्यानंतर बर्निंग स्मेल येतो.

▌काही काळ दुर्गंधीचा त्रास होईल

स्कार/डाग पडू नये, त्वचा पूर्ववत व्हावी याकरिता काही जेलचा वापर करा. पण ॲन्स्थेशियाचा प्रभाव जसा कमी होतो तसा काही दिवस त्रास जाणवतो.

चेहऱ्यावर पुन्हा त्याच जागी पिंपल का येतो?

पिंपलचा त्रास टाळण्यासाठी घरगुती उपाय, उत्तम फेसवॉश वापरणे यासारखे सारे खटाटोप करता. परंतु, अनेकांमध्ये विशिष्ट काळानंतर पुन्हा त्याच जागी पिंपल येण्याची समस्या आढळून येते. पिंपल्सचे चेहऱ्यावर त्याच त्याच जागी पुन्हा येणे यामागील नेमके काय याबद्दलचा खास सल्ला डर्मेटोलॉजिस्ट डॉ. सेजल शहा यांनी दिला आहे. त्वचेच्या खाली वाढणारे पिंपल्स अनेकदा त्वचेवर दिसत नाहीत. त्वचेवरील छिद्रांमधून जेव्हा तेल बाहेर पडण्याची प्रक्रिया वाढते तेव्हा सूजही वाढते. त्वचेच्या खाली तेलामुळे गोलाकार फुगवटा निर्माण होतो. त्याचे प्रमाण तेलावर अवलंबून असते. तसेच तुम्हाला सतत चेहऱ्याला हात लावण्याची सवय असेल तर पुन्हा त्याच जागी ॲक्ने वाढण्याचा धोका अधिक असतो. सतत चेहऱ्याला हात लावण्याच्या सवयीमुळे चेहऱ्यावरील मळ, तेल पुन्हा छिद्रांमध्ये ढकलला जातो. यामुळे पिंपल्सची वाढ अधिक प्रमाणात होते.



पिंपलचा त्रास कमी करण्यासाठी काय कराल ?

पिंपलमध्ये पस निर्माण झालेला असल्यास त्याला फोडण्याचा मोह टाळा. त्याला सतत हात लावू नका. ते आपोआपच कमी होण्यासाठी थोडा वेळ द्या. किंवा डर्मेटोलॉजिस्टचा सल्ला घ्या. अनेकदा पिंपल फोडल्यानंतरही त्यातील सारा पांढरा भाग/पस बाहेर पडत नाही. त्यामुळे पुन्हा त्याजागी पिंपल वाढण्याची शक्यता निर्माण होते. म्हणूनच चेहरा पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी salicylic acid युक्त फेसवॉशचा वापर करा. यामुळे अतिरिक्त तेल काढण्यास मदत होते. benzoyl peroxide चा समावेश असलेल्या उत्पादनांची निवड केल्यास त्वचेवर वाढणारे आणि ॲक्नेच्या निर्मितीला कारणीभूत ठरणाऱ्या बॅक्टेरियांचा प्रभाव कमी करण्यास मदत होते.



पाण्यात पाय बुडवून ठेवण्याचे फायदे

मॉलमध्ये किंवा मार्केटमध्ये फिरायला तर सर्वांना आवडतं, पण तिथून आल्यावर जो थकवा येतो त्याने अगदी काही काम नको नकोसं वाटतं. पण असा थकवा आपण काही वेळातच दूर करू शकता. त्यासाठी हे करा ▌एका टबमध्ये कोमट पाण्यात थोडंसं मीठ घालून आपले दोन्ही पाय बुडवा. याने थकवा दूर होतो आणि चालताना सूज आली असल्यास त्यावरही राहत मिळते. ▌ज्या लोकांना रात्री झोप न येण्याची तक्रार असते त्यांनी हा प्रयोग नक्की अमलात आणावा. झोपण्यापूर्वी कोमट पाण्यात १५ ते २० मिनिटे पाय बुडून ठेवावे. ▌याने रक्तप्रवाह सुरळीत होतो. ▌जे लोक रात्रभर एकाच कुशीवर झोपतात, त्याने सकाळी उठून हा प्रयोग करावा. याने दिवसभर फ्रेश जाणवेल. ▌या प्रयोगाने किडनीची एनर्जी वाढते. ▌संधिवाताची तक्रार असलेल्या लोकांनी पाण्यात दालचिनी आणि काळे मिरे टाकून पाय पाण्यात ठेवावे. ▌हा प्रयोग जेवण झाल्यावर करणे योग्य ठरेल. ▌लो ब्लड प्रेशरची तक्रार असलेल्यांनी गरम पाण्यात पाय ठेवून बसू नये. मधुमेही रुग्णांनी पण हा प्रयोग करू नये.

आपल्या दैनंदिन जीवनमानात अगदी किरकोळ आजार हे कधीकधी दुर्लक्षिले जातात, मात्र त्याचा त्रास जाणवू लागला की त्यानंतर डॉक्टरकडे धाव घेतली जाते. मात्र अगदी किरकोळ वाटणारे दुखणे हे एखाद्या आजाराचे कारण आहे असे समजले की मग मनात भीती निर्माण होते. शिवाय त्या आजाराचे गंभीर परिणाम आयुष्याची चिंता, खर्च आदी गोष्टींचे टेन्शन निर्माण होऊन मग वेळीच इलाज केला असता, तर बरे झाले असते असे वाटून जाते. यावेळी अगदी किरकोळ म्हणून वाटणारे दुखणे हे एखाद्या गंभीर आजाराचे लक्षण आहे, असे वाटले तर त्यावर वेळीच इलाजही केला जाऊ शकतो.

किरकोळ आजारांकडे दुर्लक्ष नको

पित्त : आपल्याला नियमित काही खाल्ले तर त्याचा त्रास होतो. खाल्लेले पचत नाही, किंवा भूकच लागत नाही. छातीत जळजळ, तेलकट किंवा दुपारच्या जेवणाव्यतिरिक्तही काही खाल्ले तरी ते पचत नाही, म्हणून मग ते किरकोळ पित्तावर ढकलले जाते. पण मग त्याचा अति त्रास झाला की, मग डॉक्टरकडे जाण्यावाचून पर्याय उरत नाही. पित्तामुळे काही खाणे होत नाही. यामुळे एकप्रकारची त्रस्तता दिसून येते. मात्र यावर वेळीच इलाज न केल्यास याचा परिणाम पित्ताचे खडे होणे आदीसारख्या समस्या निर्माण होण्याकडे दिसून येतो. मग पित्ताचे खडे काढण्यासाठी ऑपरेशन केली जातात.



पोटदुखी : पोटदुखीसारख्या वारंवार उद्भवणाऱ्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. काही घरगुती उपाय करून किंवा अशा दुखण्यांकडे दुर्लक्ष करून ती किरकोळ म्हणून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र मासिक पाळीच्या वेळी पोटात दुखणे, किंवा इतरवेळी वारंवार पोटात दुखणे हे नेहमीचेच म्हणूनही त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. एका उदाहरणामध्ये एका महिलेच्या वारंवार पोटात दुखण्याच्या तक्रारीमुळे काही घरगुती इलाज केल्यानंतरही काही गुण नाही म्हणून मग डॉक्टरी उपाय करण्याचे ठरले. स्टोनमुळे पोटात दुखत असावे असा अंदाज करून डॉक्टरनेही त्यावरील औषधे सुरू केली. काही पथ्ये सांगून औषधांना खर्चदेखील झाला. मात्र, तरीदेखील हे दुखणे सुरूच राहिल्याने शेवटी तज्ज्ञांकडून तपासणी केली असता, गंभीर आजाराचे निदान झाले आणि हेच वारंवार दुर्लक्षिले गेलेले दुखणे आयुष्याची चिंता भेडसावणारे ठरले.

डोकेदुखी : अगदी कोवळ्या वयाची मुले आपले डोके दुखते म्हणून अगदी डोके धरून बसतात. यावेळी लहान मुलांना चष्मा लागणे स्वाभाविक आहे म्हणून त्यांना चष्मा असावा असा अंदाज करून डोकेदुखीच्या आजाराकडे बरेचदा दुर्लक्ष केले जाते. शालेय जीवनात अशा तक्रारी वारंवार उद्भवताना दिसून येतात. चक्कर येणे, डोके दुखणे अशा आजाराकडे दुर्लक्ष करण्यापेक्षा लहान मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

चमकदार दातांसाठी झोपण्याच्या वेळेस करा ही कामे

▌नारळाचे तेल ऑरगॅनिक आणि नॅच्युरल टीथ व्हाईटनर आहे. नारळाच्या तेलाने तुम्ही तुमचे दात चमकवू शकता. यासाठी थोडेसे नारळाचे तेल घेऊन १५ मिनिटे तोंडात ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चूळ भरा. यामुळे फायदा होईल. ▌दात चमकवण्यासाठी सोपा उपाय म्हणजे स्ट्रॉबेरीज. स्ट्रॉबेरीच्या गरात चिमूटभर बेकिंग सोडा मिसळा. हे मिश्रण ब्रशवर घेऊन दात घासा. यामुळे दातांवरील पिवळेपणा दूर होईल. ▌ॲपल सिडर व्हिनेगरही दात चमकावण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. याचे काही थेंब दातांवर चोळा. अधिक फायद्यासाठी सकाळी ब्रश करण्याआधी या व्हिनेगरने दात चोळा.



औषधी दुधी भोपळा

दुधी भोपळा म्हटले म्हणजे अनेक जण नाके मुरडतात. मात्र तो किती गुणकारी आहे, याबद्दल तुम्हाला कदाचित माहीत नसावे. दुधी भोपळा औषधी भाजी असून त्यात लोह, कॅल्शियम, फॉस्फरस व अन्य खनिजे आहेत. तंतुमय, रेषादार तसेच जीवनसत्त्व 'क' असलेली ही फळभाजी दुर्लक्षित आहे. मात्र, आता हळूहळू त्याचे महत्त्व नागरिकांना पटत असल्याने ते खाण्याचे प्रमाण वाढले आहे.



▌हृदयविकाराच्या रुग्णांना दुधी भोपळ्याचा रस सकाळ-संध्याकाळ एक-एक वाटी दिल्यास रोहिण्यांमधील कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

▌दुधी भोपळ्याचा रस एक वाटी, लिंबाचा रस एक चमचा व एक चमचा मध एकत्र करून प्यायल्यास मूत्रविकार कमी होतात.

▌रोज सकाळी काही न खाण्याआधी अर्धा वाटी दुधी भोपळ्याचा रस व एक चमचा आल्याचा रस पाण्यात मिसळून घेतल्यास स्थूलपणा कमी होतो.

▌भोपळ्याच्या एक वाटी रसात एक चमचा मध व चिमूटभर जायफळ पूड मिसळून तयार झालेला लेप त्वचेवर लावल्याचा कांती उजळते.

▌एक चमचा आवळा चुर्ण भोपळ्याच्या रसात मिसळून रात्री कोमट पाण्यासह घेतल्याने झोप चांगली लागते. तसेच पोट साफ होते.

▌दुधी भोपळ्याचा एक वाटी रस एक चमचा ओवा, चिमूटभर काळे मीठ घालून गरम करून ते चाखल्याने पोटाचा फुगीरपणा कमी होतो.

▌दुधी भोपळ्याचा रस आटवून त्यात एक मिरे व पिंगळी वाटून त्यात एक चमचा मध मिसळून त्याचे चाटण लहान मुलांना दिल्यास छातीतील कफ दूर होतो.

फॅन्सी आणि क्लासी फ्रिलचे ड्रेस!

लहानपणी तुम्ही फ्रिलचे फ्रॉक आणि स्कर्ट घालून ठुमकत ठुमकत चालत होता. तसेच फ्रिलदार फ्रॉक, स्कर्ट आणि शर्ट सध्या चलनामध्ये आले आहेत. फ्रिलचे फ्रॉक तर मुली कॉर्पोरेट सूटसोबत घालणे पसंत करतात. कारण बोअरिंग दिसणारे फॉर्मल सूट फ्रिलच्या फ्रॉकमुळे नवीन लूकमध्ये दिसतात.

फ्रिलच्या ड्रेसचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे हे फेमिनीन लूक देतात आणि तुम्ही याला पार्टी वेअर ते कॅज्युअल वेअरपर्यंत घालू शकता. या प्रकारचे रफल्ड ड्रेस तुम्ही बऱ्याच डिझाईनमध्ये तयार करू शकता. जसे रफल्ड रँप ड्रेस, सिंगल लेअर रफल्ड ड्रेस, टीर्ड रफल्ड ड्रेस.



रफल्ड ड्रेस स्टायलिश लूक तर देतातच, त्याशिवाय तुमच्या बऱ्याच समस्यांचे निदान देखील करतात. जसे तुमची बस्ट लाइन स्मॉल असेल तर अशा ड्रेसची निवड करा ज्यात फ्रिल वरच्या बाजूस दिली असेल. आणि जर बस्ट लाइन हेवी असेल तर तुमच्यासाठी अशा प्रकारचे ड्रेस योग्य राहतील, ज्यात फ्रिल व्हर्टिकली स्ट्रेट लाइनमध्ये असेल. जर तुम्ही बॉडीच्या खालील भागाला हेवी लूक देण्याचा प्रयत्न करत असाल तर खालच्या बाजूला फ्रिल असलेले फ्रॉक परिधान करणे उपयुक्त ठरेल.

सध्या बॉलीवूडच्या अभिनेत्री देखील फ्रिलने सजलेले फ्रॉक परिधान करतात. मागील काही समारंभात दीपिका पदुकोण, अनुष्का शर्मा, प्रियंका चोप्रा, सोनाक्षी सिन्हा व प्रीती झिंटा फ्रिलच्या ड्रेसमध्ये आल्या होत्या.

फ्रिलच्या ड्रेसमध्ये तुम्हाला ज्वेलरीची चिंता करण्याची गरज नसते. हे फ्रॉक बिन हेवी ज्वेलरीचे पण चांगले लूक देतात. फ्रिलदार ड्रेसला तुम्ही बऱ्याच डिझाईन व मटेरियलमध्ये तयार करू शकता. हे हलके कपडे जसे जॉर्जेट, शिफॉन, कॉटन आणि सॅटिनमध्ये जास्त चांगले लूक देतात. तर मग आता पुढच्या पार्टीत वेगळे दिसण्यासाठी एखादा फ्रिलचा ड्रेस स्वतःसाठी नक्कीच तयार करा.



उपयोगी पडणाऱ्या ब्युटी टिप्स



▌स्टीम बाथ घेण्यापूर्वी शक्य तितके जास्त पाणी प्यावे म्हणजे डिहायड्रेशनचा त्रास होणार नाही.

▌नाक, तोंडावर कपडा बांधून स्वयंपाकघराची स्वच्छता केल्याने धुळीचे कण शरीरापर्यंत पोहोचत नाहीत.

▌कैरीच्या कच्च्या पांढऱ्या बिया, मेंदी, कडूलिंबाची पावडर यांचे मिश्रण केसांकरिता उपयोगी असते.

▌नेल ब्लिच तयार करताना सायट्रिक ॲसिड किंवा हायड्रोजन पेरॉक्साईडचा वापर साधारणपणे केला जातो.

▌रात्री झोपताना लिंबाचा रस, गुलाब पाणी व ग्लिसरिन लावा. हात-पाय मऊ व चकचकीत होतात.

▌स्विमिंग करताना स्विमिंग कॅप वापरावी. कारण पूलच्या पाण्यात क्लोरिन जास्त असल्यामुळे केस खराब होतात.

▌केसांमध्ये हेअर ड्रायरचा वापर कमीत कमी करावा. कारण, केस गळण्यास सुरुवात होते तसेच ते द्विभाजितही होतात.

▌नॅचरल मेकअपसाठी फाऊंडेशन लावल्यानंतर दोन मिनिटानंतर पावडर लावायला पाहिजे. त्याने फाऊंडेशनमुळे पडणारे चकते दिसणार नाही.

▌जरदोसी मेंदी सिल्व्हर किंवा गोल्डन शेडमध्ये असते. मेंदीने हातांवर सिल्व्हर किंवा गोल्डन रंगाने डिझाइन बनवण्यात येते.

▌चौपाटी किंवा एखाद्या डोंगरावर ट्रेकिंगला जाण्याचा प्लान करत असल तर आपल्या त्वचेची काळजी घ्यायला विसरू नका.

▌गुडघ्यापर्यंत मिडी किंवा मिनी स्कर्टसोबतसुद्धा लॅगिंग्सचा वापर करता येतो. लाँग स्कर्टसोबत स्लॅक्स वापरू शकता.

डायबेटिसच्या रुग्णांनी खाण्या-पिण्याबाबत विशेष पथ्य पाळणे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असते. शुगर कंट्रोलमध्ये ठेवण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. त्यासाठीच या टिप्स..

शुगरवर कंट्रोल ठेवण्यासाठी हे टाळा...

▌साखरयुक्त पदार्थ, मध, सरबत, सिरप, कोल्ड ड्रिंक्स, गूळ, तूप, केक, पेस्ट्री, आईस्क्रीम, दारू, बीयर आदींचे डायबेटिसच्या रुग्णांनी सेवन करू नये. ▌ज्या भाज्या जमिनीत येतात, उदा. बटाटे, रताळे, इत्यादी भाज्या खाणे टाळावे. ▌केळी, चिकू, आंबा, सीताफळ, द्राक्ष, पपई, पेरू, ऊस आदी फळे वर्ज्य करावीत. ▌काजू, मनुका, बदाम, भुईमुगाच्या शेंगा, अक्रोड आदी सुकामेवा टाळावा. ▌मांसाहार टाळावा. ▌भात, वरण, दूध, पनीर, दही, मासे आदी पदार्थ कमी प्रमाणात खावेत. ▌कच्च्या भाज्या उदा. मेथी, पालक, दुधी भोपळा, मुळा, कोथिंबीर, गोबी, चवळी, टोमॅटो, कांदा, कारले, कांद्याची पात, कैरी, लिंबू पाणी आदी पदार्थ भरपूर प्रमाणात खावे



दररोज व्यायाम करणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे. व्यायाम केवळ फिट ठेवत नाही तर अनेक आजारांपासूनही संरक्षण करतो. पण व्यायाम करण्यासाठी अधिक ऊर्जेची गरज भासते. त्यामुळे आहारात योग्य त्या पदार्थांचा समावेश करणं आवश्यक आहे.

दररोज व्यायाम करणाऱ्यांनी आहारात 'या' पदार्थांचा समावेश करा



प्रोटीन : शरीराच्या वजनानुसार, दररोज ०.९ ग्रॅम प्रोटीन आपल्या आहारातून घेणं गरजेचं आहे. जर तुम्ही वजन नियंत्रणात राखू इच्छिता तर कॅलरीचं प्रमाण तपासणं महत्त्वाचं आहे.

फळे : जितकं शक्य आहे तितकं आहारात फळांचा समावेश करा. फळांमध्ये पुरेशा प्रमाणात फायबर असतं. व्यायाम करण्याच्या जवळपास दोन तासांपूर्वी आणि त्यानंतरही केळे खाणे शरीरासाठी फायदेशीर आहे. संत्री, द्राक्षही फायदेशीर ठरतात.

कार्बोहायड्रेट : कार्बोहायड्रेट प्रोटीनच्या तुलनेत शरीराला लवकर ऊर्जा प्रदान करतात. याची व्यायामावेळी अधिक आवश्यकता असते. कार्बोहायड्रेट मांसपेशींमध्ये ग्लायकोजनची गरज भरून काढण्यासाठी आवश्यक आहेत. त्यामुळे आहारात फरसबी, ब्राऊन राइस यासारख्या पदार्थांचं सेवन करणं महत्त्वाचं ठरतं. व्यायाम करण्याआधी ५० ग्रॅम कार्बोहायड्रेट घेण्याचा सल्ला दिला जातो.

बदाम दूध किंवा ओट्स दूध : व्यायाम करण्याआधी बदाम दूध किंवा ओट्स दूध पिणं आवश्यक ठरतं. हे शरीराला पुरेशी ऊर्जा पुरवण्याचं काम करतात. यामुळे व्यायाम करतानाही ऊर्जा मिळते. तसंच शरीराला पुरेसं पोषणही मिळण्यास मदत होते.

स्ट्रॉबेरी फारच आकर्षक दिसते, त्यामुळे पाहताक्षणीच खावीशी वाटते. आंबट-गोड चवीचं हे फळ थंडीच्या दिवसात मिळतं. स्ट्रॉबेरीचा आकार लहान असला तरी आरोग्याच्या दृष्टीने ती फारच गुणकारी आहे. स्ट्रॉबेरी हे मेंदूचं खाद्य असल्याचं एका संशोधनातूनही समोर आले आहे. भरपूर ॲंटीऑक्सिडंट्स असल्याने स्ट्रॉबेरीच्या सेवनाने मेंदूची क्षमता वाढते. इतर अनेक रोगांवरही हे फळ उपयुक्त ठरतं. चला जाणून घेऊ स्ट्रॉबेरीचं आपल्या आहारातील महत्त्व...

बहुपयोगी स्ट्रॉबेरी

▌दिवसाला तीन ते चार स्ट्रॉबेरी खाल्ल्याने स्मरणशक्ती तसेच एकाग्रता वाढायला मदत होते.

▌स्ट्रॉबेरी हे पोटॅशियम आणि 'क' जीवनसत्त्वाने समृद्ध फळ आहे. हे दोन्ही घटक तुम्हाला उत्साही ठेवण्यास मदत करतात.



▌वाढत्या वयात त्वचेवर सुरकुत्या पडतात. पण स्ट्रॉबेरीमुळे या सुरकुत्यांचं प्रमाण कमी होतं.

▌स्ट्रॉबेरी खाल्ल्याने तुमची रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

▌हार्मोन्सचं संतुलन तसंच हाडांच्या आरोग्यासाठी स्ट्रॉबेरीचा आहारात समावेश करायला हवा.

▌शरीरावर आलेली सूज स्ट्रॉबेरीच्या सेवनाने कमी होते.

▌कॅन्सरपासून बचाव करण्याची क्षमता स्ट्रॉबेरीत आहे.

▌केस आणि त्वचा या दोन्हीचं आरोग्य राखण्यातही स्ट्रॉबेरी महत्त्वाची भूमिका बजावते. म्हणूनच अनेक सौंदर्यप्रसाधनांमध्ये स्ट्रॉबेरीच्या तत्त्वांचा वापर केला जातो.

▌स्ट्रॉबेरीतील काही गुणधर्मांमुळे सूर्याच्या अतिनील किरणांपासून केस आणि त्वचा यांचं रक्षण होऊ शकतं.

मुंबई-गोवा महामार्गावर 'वसुली सुरू'

रायगड जिल्ह्यात प्रवेश करण्यासाठी खारपाडा येथे पहिला टोल लागू

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक



मुंबईहून कोकणात तसेच रायगड जिल्ह्यात प्रवेश करण्यासाठी वाहनचालकांना आता खारपाडा येथील पहिल्या 'टोलधाडी'ला (टोलनाका) सामोरे जाऊनच पुढे जावे लागणार आहे. या टोल वसुलीची सुरुवात शुक्रवारी सकाळपासून केली. टोलवसुली सुरू होणार म्हणून, अगोदर सुविधा द्या, नंतर टोल वसुली करा, अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेने कडून करण्यात आली होती. मात्र महामागार्पासून २० किलोमीटर अंतरावरील वाहनमालकांना मासिक सवलतीचा पास देण्यापूर्वीच ही टोलधाड राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सुरू केली. ही टोलवसुली खारपाडा ते कासू या ४२ किलोमीटर अंतर महामागार्साठी केली जात आहे. या टोलधाडीचा आकडाही मोठा आहे. प्रवाशांना आता खारपाडा टोलनाक्यावर ९५ रुपयांचा टोल द्यावा लागणार आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे काम आणि सुविधा पूर्ण नसतानाच उन्हाळी सुट्यांमध्ये गावी जाणाऱ्यांची संख्या वाढली असतानाच टोलवसुली सुरू झाल्याने कोकणवासीयांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतरही महामार्गावरील कामे संथ गतीने सुरू असून, रुग्णवाहिका, शौचालये, स्थानिक वाहनांना टोलमधून सवलत अशा मूलभूत सुविधा अपुऱ्याच असल्याची तक्रार प्रवाशांकडून केली जात आहे.

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खारपाडा टोलनाक्यावर स्थानिक रहिवासी आणि सर्व एलएमव्ही वाहनांसाठी टोलमाफी लागू करण्याची घोषणा केली. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी काही अत्यावश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी शिवसेना (ठाकरे गट) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राजकीय पक्षांसह स्थानिक नागरिकांकडून करण्यात आली आहे. त्यामध्ये स्वच्छ व कार्यरत शौचालये, महिलांसाठी व बालकांसाठी स्तनपान कक्ष, आपत्कालीन रुग्णवाहिका व प्रथमोपचार केंद्र, खराब वाहनांसाठी क्रेन सेवा, सुरक्षित व प्रकाशयुक्त दुतर्फा रस्ता तसेच टोल व्यवस्थापनात स्थानिक युवकांना रोजगार देण्याची प्रमुख मागणी आहे. तसेच एमएच ०६ या वाहनांना टोल पासून मुक्ती मिळावी ही प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

सिंधुदुर्गातील आठ गावांचे ड्रोन सर्वेक्षण होणार

लोहखनिज खाणीसाठी भू-चुंबकीय सर्वेक्षणाचे आदेश निर्गमित

■सिंधुदुर्गनगरी। प्रतिनिधी,



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरवली, आसोली, मळेवाड, आजगाव, धाकोरे, सोनसुरे, सखैलेखोल आणि बांध या बागायतींसाठी प्रसिद्ध निसर्गरम्य गावांवर पुन्हा खाणींचे संकट घोंगावू लागले आहे. जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड या कंपनीला लोहखनिज खाणी सुरू करण्याच्या संदर्भात ड्रोनआधारित भू-चुंबकीय सर्वेक्षण करण्यास सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेकडून मान्यता देण्यात आली आहे. एकीकडे पर्यटन विकासाचे दावे करणारे शासन दुसरीकडे निसगार्चा विनाश करणाऱ्या खाण प्रकल्पांना परवानगी देत असल्याने मोठी विसंगती निर्माण झाली असून, त्यामुळे या गावांचे अस्तित्व भविष्यात धोक्यात येईल, अशी चिंता 'घुंगुरकाठी' स्वयंसेवी संस्थेचे अध्यक्ष सतीश लळीत यांनी व्यक्त केली आहे.

या आठ गावांमध्ये काही अटींवर ड्रोनआधारित भू-चुंबकीय सर्वेक्षण करण्यास परवानगी देणारा आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने १३ मे रोजी निर्गमित करण्यात आला आहे. सावंतवाडी तालुक्यातील आजगाव, धाकोरे, मळेवाड आणि वेंगुर्ले तालुक्यातील आरवली, आसोली, सोनसुरे, सखैलेखोल तसेच बांध या गावांमध्ये हे सर्वेक्षण ४ मे ते ११ जून या कालावधीत पूर्ण करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. यामुळे शासनाला या भागातील निसर्ग आणि पर्यावरण जपत पर्यटनाला चालना द्यायची आहे की खाणींचे साम्राज्य उभारायचे आहे, याचे स्पष्ट उत्तर द्यावे, अशी मागणी सतीश लळीत यांनी केली आहे.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग यांच्या ४ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार आणि जेएसडब्ल्यू स्टील लिमिटेड यांच्या प्रस्तावावर आधारित ही परवानगी काही अटींसह देण्यात आली आहे. सर्वेक्षणादरम्यान केवळ ड्रोनचा वापर करणे, स्थानिक नागरिक, शेती, पर्यावरण आणि वन्यजीवांना कोणतीही हानी होणार नाही याची दक्षता घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायत आणि स्थानिक प्रशासनाला पूर्वसूचना देणे, ड्रोन वापराबाबतचे सर्व कायदे पाळणे, संवेदनशील क्षेत्रांमध्ये आवश्यक परवानग्या घेणे आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेवणे आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

सांगलीत चाललंय तरी काय?

15 दिवसात 3 खून, कोणा-काणाची झाली हत्या?

■सांगली। प्रतिनिधी,



सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात खुनाचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. गेल्या पंधरा दिवसांत तालुक्यात लागोपाठ तीन खुनाच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे प्रचंड सावट निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वी कोसारी येथे दादासो यमगर यांचा अपहरण-खून झाला होता. त्यानंतर संख येथे महावितरणचे वायरमन सांतोषकुमार बिरादार यांचा मध्यरात्री गोळ्या झाडून संपवण्यात आलं होतं. आता भिवरगी येथे एका तरुणाचा गळा दाबून खून करण्यात आला आहे. दारूच्या नशेत झालेल्या किरकोळ वादातून चुलत भावानेच भावाचा जीव घेतल्याची ही धक्कादायक घटना घडली असून, या घटनेचा 'लाईव्ह' व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने खळबळ माजली आहे. उमदी पोलिसांनी या प्रकरणी आरोपी सिलसिद्ध बिरादार याला तत्काळ अटक केली आहे.

दारूच्या नशेत चेष्टा-मस्करी ठरली जीवघेणी

भिवरगी-करजगी रोडवरील गौडर वस्ती येथे सोमवारी दुपारी दोनच्या सुमारास ही घटना घडली. महादेव सिद्धू बिरादार (वय 26, व्यवसाय शेती) आणि त्याचा चुलत भाऊ सिलसिद्ध मलाप्पा बिरादार (वय 27) हे दोघे एकत्र असताना त्यांच्यात दारूच्या नशेतून चेष्टा-मस्करी सुरू होती. मात्र, ही मस्करी काही वेळातच गंभीर वादात बदलली. सुरुवातीला शाब्दिक असलेला हा वाद इतका विकोपाला गेला की त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. दोघांमध्ये जोरदार झटापट सुरू झाली आणि रागाच्या भरात सिलसिद्धने महादेववर हल्ला केला. यावेळी उपस्थितांमध्ये आणि सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये ही थरारक घटना कैद झाली आहे, ज्यामुळे परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

गळा दाबून चुलत भावाचा केला खून

दोघांमध्ये सुरू असलेल्या या मारामारीत सिलसिद्ध बिरादार याने महादेवचा गळा हाताने जोरात दाबून धरला. प्रत्यक्षदर्शी आणि नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, दोघे एकमेकांच्या अंगावर बसून मारामारी करत होते, तेव्हा सिलसिद्धने महादेवचा गळा तो हालचाल करेनासा होईपर्यंत सोडला नाही. महादेव बेशुद्ध पडल्याचे लक्षात येताच आजूबाजूच्या लोकांनी धाव घेऊन त्याला तत्काळ जत ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीपूर्वीच त्याला मृत घोषित केले. या घटनेचा व्हिडिओ मोबाईलमध्ये रेकॉर्ड झाल्याने पोलिसांना तपासात मोठा पुरावा मिळाला असून, आरोपीचे नावही निष्पन्न झाले आहे. प्राथमिक तपासात गळा दाबूनच खून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरज शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.

परिसरात भीतीचे सावट आणि कुटुंबावर कोसळला शोककळा

जत तालुक्यात पंधरा दिवसांच्या अंतराने झालेल्या या तिसऱ्या खुनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भिवरगीतील या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण असून पोलीस प्रशासनाकडून कडक पावले उचलण्याची मागणी होत आहे. मृत महादेव बिरादार हा घरातील कर्ता पुरुष होता, त्याच्या निधनाने कुटुंबाचा आधार हरपला आहे. त्याच्या पश्चात गरोदर पत्नी, आई, एक भाऊ आणि विवाहित बहीण असा परिवार असून, ऐन तारुण्यात त्याचा अशा प्रकारे अंत झाल्याने गावावर शोककळा पसरली आहे. उमदी पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या असून पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

हिमालयाच्या मदतीला पुन्हा सह्याद्री धावला... एक आवाहन अन् राज्यात या ठिकाणी नो व्हेईकल

■मुंबई । प्रतिनिधी,



इराण-अमेरिका युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांसाठी एक महत्त्वाचं आवाहन केलं आहे. इंधनाची बचत करा, परदेश दौरे टाळा अन् वर्षभर सोनं खरेदी करू नका, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. नागरिकांनी मेट्रो, बस सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा, असं आवाहनही पंतप्रधानांनी केलं आहे. पंतप्रधानांच्या या आवाहनाला राज्याने पुन्हा एकदा प्रतिसाद दिला आहे. हिमालयाच्या मदतीसाठी पुन्हा एकदा सह्याद्री धावून गेला आहे. इंधन बचत करण्यासाठी राज्यात अनेक ठिकाणी नो व्हेईकल डे पाळण्यात येत आहे. तर अनेक नेत्यांनी स्वतःहून इंधनावर चालणाऱ्या गाड्या वापरणं बंद केलं आहे. अनेक नेत्यांनी परदेश दौरेही रद्द केले आहेत. जास्तीत जास्त इंधन वाचवण्यासाठी राज्यात मोठे प्रयत्न सुरू आहेत.

परभणीत रविवारी नो व्हेईकल डे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला इंधन बचतीचे आवाहन केल्या नंतर अनेक स्तरावरून या आवाहनाला प्रतिसाद मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यमंत्री तथा परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी परभणीच्या जनतेला येत्या रविवारी नो व्हेईकल डे पाळण्याचं आवाहन केल आहे. अति आवश्यकता असल्यास टू व्हीलर आणि चारचाकी वाहनांचा वापर करावा, असं आवाहन बोर्डिकर यांनी केलं आहे. मेघना बोर्डिकर या स्वतः रविवारी नो व्हेईकल डे पाळणार आहेत.

कोल्हापुरात प्रत्येक शुक्रवारी वाहन बंद


लोकप्रतिनिधींनी वाहतुकीसाठी सार्वजनिक व्यवस्थेचा वापर करावा, या आवाहनाला कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचा प्रतिसाद मिळालाय. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शिल्पा खोत यांनी कागल तालुक्यातील सेनापती कापशी या गावापासून 60 किलोमीटरचा एसटी प्रवास केला. कोल्हापुरातल्या दसरा चौकातून त्यांनी रिक्षाने जिल्हा परिषदेत प्रवेश केला. मोदींनी केलेल्या आवाहन नंतर संपूर्ण जिल्हा परिषदेमध्ये दर शुक्रवारी नो व्हेईकल डे देखील पाळण्यात येत असून आज त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.. एसटीने प्रवास केल्यामुळे इंधन बचत झालीच, शिवाय लोकांशी संवाद साधता आला. त्यांच्या समस्या जाणून घेता आल्याचे, शिल्पा खोत यांनी सांगितलंय.

नागपुरात सोमवारपासून सार्वजनिक वाहनाने प्रवास

नागपूर जिल्हा परिषदेचे कर्मचारी दर सोमवारी सार्वजनिक वाहनाने प्रवास करणार आहेत. सोमवार 18 मे पासून या उपक्रमास सुरुवात होणार आहे. मोदी यांनी इंधन बचत आणि इतर काटकसरीचे उपाय सुचविल्या नंतर नागपूर जिल्हा परिषदेचा पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. नागपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी हे सोमवारी स्वतः घरून कार्यालयापर्यंत पायी येणार आहेत.

प्रायव्हेट पार्टमध्ये लोखंड घासण्याचं हत्यार, कवटीचे हाड तुटले... प्रेमविवाहाचा भयानक अंत

■मुंबई । प्रतिनिधी,



छत्तीसगडमधील अंबिकापूरला लागून असलेल्या भिठीकला हर्रा टिकरा गावातून माणुसकीला कलंकित करणारी एक अत्यंत भीषण घटना समोर आली आहे. प्रदीप अगरिया नावाच्या नराधमाने त्याची 23 वर्षीय पत्नी हीराबाई हिची अमानुष मारहाण करून निर्घृण हत्या केली. प्रदीपने पत्नीला लाठ्याकाठ्यांनी बेदम मारहाण केली आणि तिच्यावर जीवघेणा हल्ला करून तिचा जीव घेतला. या अत्यंत क्रूर गुन्ह्यानंतर स्वतःचा बचाव करण्यासाठी आरोपीने एक धक्कादायक पाऊल उचलले. त्याने पत्नीचा मृतदेह आपल्या मोटरसायकलच्या मागे बांधला आणि तो तशाच अवस्थेत घेऊन मेडिकल कॉलेज रुग्णालयात पोहोचला. तिथे त्याने डॉक्टरांना संभ्रमात टाकण्यासाठी एक खोटी कहाणी सांगितली की, त्याच्या पत्नीचा अपघात झाला आहे. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी तपासणी अंती महिला मृत असल्याचे घोषित करताच आरोपी प्रदीप अगरिया तिथून दुचाकीसह फरार झाला.

या प्रकरणाचा उलगडा 15 मे 2026 रोजी झाला, जेव्हा मेडिकल कॉलेजच्या फॉरेन्सिक विभागाच्या पथकाने मृतदेहाचे शवविच्छेदन (पोस्टमार्टम) केले. या तपासणीत समोर आलेले तथ्य इतके भयानक होते की डॉक्टरांनाही धक्का बसला. फॉरेन्सिक विभागाचे प्रमुख डॉ. संटू बाग यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत हीराबाई ही तीन महिन्यांची गर्भवती होती. पोस्टमार्टेम अहवालात उघड झाले की, आरोपीने तिच्या गुप्तांगात 27 सेंटीमीटर लांबीचे लोखंड घासण्याचे हत्यार घुसवले होते. तिच्या डोक्यावर लाकडी दांडक्याने इतक्या जोरात प्रहार करण्यात आले होते की, तिच्या कवटीचे हाड पूर्णपणे तुटले होते. मृतदेहावर वेगवेगळ्या 18 ठिकाणी गंभीर जखमांच्या खुणा आढळून आल्या. तज्ज्ञांच्या मते, आरोपीने ती लोखंड घासण्याचे हत्यार शरीरात आत ढकलण्यासाठी मृतिकेच्या पोटावर आणि मांड्यांवर लाथा मारल्या असाव्यात, ज्यामुळे तिच्या गर्भातील निष्पाप शिशूचाही वेदनादायक मृत्यू झाला.

प्रेमविवाहानंतरही वारंवार मारहाण आणि गावातील तक्रारी

मृत हीराबाई ही लखनपूर येथील सकरिया गावची रहिवासी होती आणि तिने मणीपूर (भिठीकला हर्राटिकरा) येथील प्रदीप अगरिया याच्याशी प्रेमविवाह केला होता. या दाम्पत्याला चार लहान मुले आहेत, ज्यांच्यामध्ये अंदाजे दीड वर्षांच्या दोन जुळ्या मुलांचाही समावेश आहे. हीराबाई ही चौथ्यांदा गर्भवती होती. माहेरच्या लोकांनी सांगितले की, आरोपी प्रदीप हा लग्नानंतर सतत पत्नीला मारहाण करत असे. यापूर्वीही त्याने तिच्यावर कुऱ्हाडीने प्राणघातक हल्ला करून तिला गंभीर जखमी केले होते. त्याच्या अशा हिंसक आचरणामुळे संपूर्ण गावात त्याच्याविरुद्ध आधीपासूनच अनेक तक्रारी होत्या आणि तो एक अत्यंत विकृत प्रवृत्तीचा व्यक्ती म्हणून ओळखला जात होता.

मदतीसाठी मुलांचा टाहो आणि पोलिसांकडून आरोपीचा शोध

या भयानक घटनेच्या वेळी आरोपीची चारही निष्पाप मुले घरातच हजर होती. वडिलांकडून आईला होत असलेली अमानुष मारहाण पाहून मुलांनी मोठ्याने ओरडून शेजाऱ्यांकडे मदतीची याचना केली होती, परंतु दुर्दैवाने एकही शेजारी किंवा गावकरी त्यांच्या मदतीसाठी पुढे आला नाही. आरोपी जेव्हा मृतदेह दुचाकीला बांधून रुग्णालयात घेऊन जात होता, तेव्हाही मुलांनी रस्त्यावरील लोकांना सांगितले की त्यांच्या आईला खूप मारहाण झाली आहे. ही माहिती हळूहळू महिलेच्या माहेरच्या लोकांपर्यंत पोहोचली आणि त्यांनी तात्काळ मेडिकल कॉलेज रुग्णालय गाठले, जेथे त्यांना हीराबाईचा मृतदेह छिन्नविछिन्न अवस्थेत मिळाला. सरगुजा पोलिसांनी पोस्टमार्टम प्रक्रिया पूर्ण करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला असून फरार आरोपी पतीचा शोध घेण्यासाठी पथके रवाना केली आहेत.

बांगलादेशी तरुणी इन्स्टाग्रामवरील प्रेमाला शोधत थेट जळगावात

विना व्हिसा भारतात केली घुसखोरी



जोशी पेठ परिसरात परदेशी महिला विनापरवाना राहत असल्याची गुप्त माहिती

पोलिसांनी भोई गल्ली, जोशी पेठ परिसरात एका परदेशी महिला विनापरवाना राहत असल्याची गुप्त माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यातच आला होता. त्याचदरम्यान कोणीका राणी शामलचंद्र राय (वय 20) ही महिला आढळून आली होती. एकमेकांची आधी ओळख झाली, नंतर ओळखीचे प्रेमसंबंधात रुपांतर झाले.

■जळगाव। प्रतिनिधी,

जळगाव शहरात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इन्स्टाग्रामवरील प्रेमसंबंधातून बांगलादेशी तरुणी विनाविसा थेट जळगावात आली. कोणीका राणी शामलचंद्र राय असे संबंधित तरुणीचे नाव आहे, विनाविसा प्रवास केल्याने पोलिसांनी तरुणीला अटक केली. तसेच सोने कारागीर चिन्मय जगन्नाथ यांच्यासोबत त्या तरुणीची ओळख झाल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी शनिपेठ पोलिसांनी कारवाई करत आश्रय देणाऱ्यांवर गुन्हा दाखल केला.

पासपोर्ट किंवा व्हिसा नसताना महिलेची भारतात अवैधपणे घुसखोरी

तपासातून ती कोणतेही वैध पासपोर्ट किंवा व्हिसा नसताना अवैधपणे तिने भारतात घुसखोरी केली. या प्रकरणी पोलिसांनी कोणीका राणी आणि चिन्मयवाला यांच्याविरुद्ध इमिग्रेशन व परदेशी कायदा 2025 अंतर्गत गुन्हा दाखल करून बांगलादेशी तरुणीला अटक केली.

दरम्यान, कोणीका आणि चिन्मय यांनी लग्न केल्याची माहिती सांगितली. परंतु याबाबत त्यांच्याकडे कुठलाही पुरावा अद्याप समोर आलेला नाही. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

सौंदर्यवतीच्या लग्नात पालकांकडून 28 लाखांचा खर्च... पण 2 महिन्यात बॉडी आली

■मुंबई । प्रतिनिधी,

लग्नाच्या दुसऱ्या दिवसापासून छळ आणि फसवणुकीचा पर्दाफाश

लग्न आटोपून विशाखापट्टणममधील रेसापुवनीपालेम येथील घरी पोहोचताच सोमेश्वरचे खरे रूप समोर आले. त्याने तेजश्रीला स्पष्टपणे सांगितले होते की, त्याने सौंदर्यासाठी नाही तर केवळ पैशांसाठी तिच्याशी लग्न केले आहे. विशाखापट्टणममध्ये आल्यापासूनच तिच्यावर शारीरिक आणि मानसिक अत्याचार सुरू झाले. आरोपी सोमेश्वर तिला आणखी हुंडा आणण्यासाठी वारंवार छळ करू लागला. पोलीस तपासात असेही समोर आले आहे की, सोमेश्वरचे इतर तरुणींशीही अनैतिक संबंध होते, ज्यामुळे पती-पत्नीमध्ये सतत वाद होत असत. हा केवळ हुंड्याचा प्रश्न नसून एका सुनियोजित फसवणुकीचा भाग असल्याचे तपासातून दिसून येत आहे, ज्यामध्ये एका निष्पाप तरुणीला बळी देण्यात आले.




आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये एका नवविवाहितेच्या संशयास्पद मृत्यूने संपूर्ण परिसर हादरला आहे. श्रीकाकुलम येथील रहिवासी असलेल्या तेजश्री नावाच्या तरुणीचा विवाह होऊन अवघे दोन महिने झाले होते, परंतु हुंड्यासाठी लोभी असलेल्या पतीने तिचे आयुष्य हिरावून घेतले. तेजश्रीच्या पालकांनी आपल्या मुलीच्या उज्वल भविष्यासाठी श्रीकाकुलम येथीलच दप्पा सोमेश्वर राव याच्याशी 6 मार्च रोजी मोठ्या थाटामाटात तिचे लग्न लावून दिले होते. सोमेश्वरने स्वतःला विशाखापट्टणम डॉकयार्डचा कर्मचारी असल्याचे खोटे सांगितले होते आणि महिला हॉस्टेलच्या माध्यमातून दरमहा 2 लाख रुपयांची कमाई असल्याचा बनाव रचला होता. मुलीला सुरक्षित घर मिळत आहे या विचाराने पालकांनी 18 लाख रुपये रोख आणि 19 तोळे सोने असा एकूण 28 लाखांहून अधिक खर्च केला, मात्र हे सर्व एक षडयंत्र असल्याचे लग्नानंतर लगेचच स्पष्ट झाले.

7 तारखेला जेव्हा तेजश्रीची आई शारदा यांनी आपल्या मुलीला फोन केला, तेव्हा अनेकदा रिंग जाऊनही फोन उचलला गेला नाही. अखेर सोमेश्वरने फोन उचलला आणि अतिशय थंड स्वरात सांगितले की तेजश्रीने गळफास लावून आत्महत्या केली आहे. ही बातमी ऐकताच कुटुंबाला मोठा धक्का बसला. मात्र, जेव्हा तिचे आई-वडील विशाखापट्टणममध्ये पोहोचले, तेव्हा त्यांना तेजश्रीच्या शरीरावर जखमांच्या खुणा आणि गळ्यावर आवळल्याचे खोल व्रण दिसले. सोमेश्वर याने तिला आधी बेदम मारहाण केली आणि नंतर तिची गळा आवळून हत्या केली, तसेच या हत्येला आत्महत्येचे रूप देण्याचा प्रयत्न केला, असा थेट आरोप तेजश्रीच्या कुटुंबीयांनी केला आहे.

या घटनेनंतर श्री टाउन पोलिसांनी मृत तरुणीच्या आईच्या तक्रारीवरून तत्परतेने कारवाई केली आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम 85, 108 आणि हुंडा प्रतिबंधक कायद्याच्या कलम 3 आणि 4 नुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सोमेश्वर राव याला पोलिसांनी अटक केली असून त्याची सखोल चौकशी सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राथमिक तपासात हुंड्यासाठी छळ आणि ब्लॅकमेलिंगचे ठोस पुरावे मिळाले आहेत. सध्या पोलीस शवविच्छेदन अहवालाची वाट पाहत असून, त्यातून मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. एका निर्दयी पतीमुळे एका तरुण मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त झाल्याने समाजात संतापाची लाट उसळली आहे.

'तू घर जावई आहेस...' मेहुण्याचा टोमणा दाजीच्या जिव्हारी

■जळगाव। प्रतिनिधी,



छत्तीसगडच्या रायपूर येथील सरोरा परिसरात कौटुंबिक वादातून सततच्या टोमण्याने प्रकरणाला खूनाचं रूप आलं. मागील तीन वर्षांपासून पत्नी आणि एक मुलगा तसेच नवरा घर जावई म्हणून राहत होता. त्याला घर जावई म्हणून अनेकदा टोमणा दिला जायचा, हाच टोमणा त्याच्या जिव्हारी लागला. अशातच त्याने आपल्याच मेहुण्याची हत्या केली. हत्या केलेल्या घर जावयाचं नाव प्रकाश असे आहे. तसेच हत्या करण्यात आलेल्या मेहुण्याचे नाव गिरीधर साहू असे आहे.

घर जावई बोलणं दाजीच्या जिव्हारी लागलं

मेहुणा गिरीधर आपला दाजी प्रकाशला घर जावई बोलायचा. मेहुण्याचे हेच बोलणं प्रकाशच्या जिव्हारी लागलं. बुधवारी त्यांच्यात यावरूनच मोठा वाद झाला होता. रात्री वाद इतका वाढला की, ज्यात प्रकाशने गिरीधरचा खून केला.

मेहुण्याला दारू पाजून दाजीनं घेतला जीव

दरम्यान, आरोपी प्रकाशने त्याचा मेहुणा, गिरीधरला रिंग रोड क्रमांक 2 वरील एका दारूच्या दुकानात नेले होते. तिथे त्याला दारू देखील पाजली होती. नंतर त्याला सरोन टर्न येथे नेले आणि पुन्हा दारू पाजली. मद्यधुंद अवस्थेत असलेल्या गिरीधरवर प्रकाशने चाकूने हल्ला करत संपवलं.

हल्ल्याची तीव्रता इतकी भीषण होती की, गिरीधरचा जागीच मृत्यू झाला. आश्चर्याची बाब अशी की, गुन्हा दाखल केल्यानंतर आरोपी प्रकाशने पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही, याउलट त्याने 112 वर फोन करून पोलिसांना आपल्या ठिकाणाची माहिती दिली आणि आत्मसमर्पण देखील केले. पोलिसांनी तात्काळपणे घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला, आरोपीला अटक करण्यात आली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com